जुलै–सप्टें.
२०२५

# साहित्य



# साहित्य : जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर २०२५

## अनुक्रम


- संपादकीय / २

- **लेख –** राजकवी यशवंत / ३
  प्रा. विश्वास वसेकर

- **कथा –** दाणापाणी / ९
  विलास सिंदगीकर

- **कथा –** माणुसकी / १८
  डॉ. श्रीकांत पाटील

- **लेख –** वेदनेचा वेध घेणारे जी.एं.चे कथाविश्व...! / २२
  डॉ. बिभीषण सातपुते

- **लेख –** यास्मिन शेख : मराठी भाषेवरील प्रेमाचा अखंड वाहता झरा / ३०
  दिलीप फलटणकर

- **कविता –** डॉ. अरुण सांगोलकर, सचिन बेंडभर, ज्योती कपिले, उमेश घेवरीकर, अविनाश आवलगावकर, वीरभद्र मिरेवाड, डॉ. ऊर्मिला चाकूरकर, प्रा. किसन वराडे, डॉ. वर्षा तोडमल, संजय ऐलवाड, व्यंकट अनेराये, श्रुती हजारे, प्रा. रामदास केदार / ३४ ते ४४

- **पुस्तकपरिचय** – सदानंद पुंडपाळ
  ५१ नामवंतांची भाषणे – अशोक बेंडखळे, हे झाड चेतनेचे – अशोक गुप्ते, प्रतिभारंग – प्रतिभा सराफ, शब्द ऋतू – निवडक लक्ष्मीकांत तांबोळी, संपादक – रणधीर शिंदे, शतकोत्तरी ओरखडा – राजीव जोशी / ४५ ते ५१

- **कार्यवृत्तान्त –** अशोक बेंडखळे (साहित्यशाखा) / ५२

# संपादकीय

मुंबई मराठी साहित्य संघाचे मुखपत्र असलेला साहित्य (जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर २०२५) हा त्रैमासिक अंक आपल्या हाती सुपूर्द करताना मनापासून आनंद होत आहे.

कवी यशवंत (यशवंत दिनकर पेंढरकर) हे मराठीतील एक सुप्रसिद्ध कवी. 'महाराष्ट्रकवी' म्हणून त्यांना गौरवाने उल्लेखले जाते. ते बडोदा संस्थानाचे राजकवी होते. जव्हार संस्थानाचे राष्ट्रगीत देखील त्यांनीच रचले. आधुनिक मराठी कविपरंपरेत राजकवी यशवंत यांना महत्त्वाचे स्थान आहे. यावेळच्या अंकात प्रा. विश्वास वसेकर यांनी कवी यशवंत यांच्यावर लिहिलेला 'राजकवी यशवंत' हा अभ्यासपूर्ण असा मुख्य लेख आपल्याला वाचता येईल.

गुरुनाथ आबाजी कुलकर्णी उर्फ जी.ए. कुलकर्णी उर्फ 'जी.ए.' हे मूळ बेळगावचे असलेले मराठी लेखक, कथाकार. ते भारतीय साहित्य अकादमी पुरस्कार विजेते सुप्रसिद्ध लघुकथा लेखक होते. त्यांच्या कथांचा मागोवा घेणारे गोव्याचे ज्येष्ठ लेखक डॉ. बिभीषण सातपुते यांचा 'वेदनेचा वेध घेणारे जीएंचे कथाविश्व' हा लेख या अंकात आहे.

मराठी भाषेच्या व्याकरणतज्ज्ञ यास्मिन शेख या वयाच्या १००व्या वर्षीही मराठी व्याकरण मनःपूर्वक शिकवतात. त्यांच्या कार्याची ओळख करून देणारा दिलीप फलटणकर यांचा 'मराठी भाषेवरील प्रेमाचा अखंड वाहता झरा' हा लेख या अंकात प्रसिद्ध झाला आहे.

सुप्रसिद्ध ग्रामीण कथाकार जळकोटचे विलास सिंदगीकर यांची या अंकात असलेली 'दाणापाणी' ही कथा अंतर्मुख करणारी आहे.

तसेच कोल्हापूरचे लेखक आणि बालसाहित्यकार डॉ. श्रीकांत पाटील यांची 'माणुसकी' ही कथाही आपल्याला माणुसकीचे दर्शन सहजपणे घडवते.

शिवाय डॉ. अरुण सांगोलकर, ज्योती कपिले, सचिन बेंडभर, उमेश घेवरीकर, अविनाश आवलगावकर, डॉ. ऊर्मिला चाकूरकर, प्रा. किसन वराडे, डॉ. वर्षा तोडमल, वीरभद्र मिरेवाड, संजय ऐलवाड, प्रा. रामदास केदार, श्रुती हजारे, व्यंकट अनेराये यांच्या सुंदर आणि आशयघन कवितांनी सजलेला काव्य विभाग आणि लेखक–समीक्षक सदानंद पुंडपाळ यांनी हे झाड चेतनेचे – अशोक गुप्ते, प्रतिभारंग – प्रतिभा सराफ, ५१ नामवंतांनी भाषणे – संपादक अशोक बेंडखळे, शब्द ऋतू : निवडक लक्ष्मीकांत तांबोळी – रणधीर शिंदे, शतकोत्तरी ओरखडा – राजीव जोशी या पाच पुस्तकांचा नेटका आणि नेमका करून दिलेला परिचय... असा भरगच्च मजकूर या अंकात आपल्याला वाचायला मिळेल. सर्व लेखक, कवींचे मनापासून आभार. तसेच अंकाचे प्रकाशक अशोक बेंडखळे यांचेही अंकासाठी मोलाचे मार्गदर्शन लाभले, त्यांचेही मनापासून आभार.

हा अंक आपल्याला कसा वाटला, ते आम्हाला जरूर कळवा. आपल्या पत्राची वाट पाहतोय. आता आपली भेट दिवाळीत. धन्यवाद.

**– एकनाथ आव्हाड**

भ्रमणध्वनी : ९८२१७७७९६८

# राजकवी यशवंत

## प्रा. विश्वास वसेकर

*'कवी तो दिसतो कसा आननी'* हे कुतूहल कवितेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाच्या मनात असते. कुसुमाग्रज, अनिल, बोरकर यांचा सहवास, पत्रव्यवहार हे माझे भाग्य; पण त्याच्याही आधीच्या पिढीचे राजकवी यशवंत यांना पाहायला मिळणे, त्यांच्यासोबत एक संपूर्ण दिवस घालवता येणे हे माझे परमभाग्य. मॅट्रिकपास होऊन मी नुकताच महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि त्याच वर्षी कवी यशवंत आमच्या स्नेहसंमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून आले! १९६८ हे ते वर्ष असावे. 'छत्रपती शिवराय' हे त्यांचे महाकाव्य नुकतेच प्रसिद्ध झाले होते.

या कवितेची सुरुवात कशी करावी, हा त्यांना पडलेला प्रश्न होता. शिवाजी महाराजांचा काळ तीनसाडेतीनशे वर्षांपूर्वीचा. ज्या सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांनी, डोंगरांनी महाराजांना पाहिले, ते डोंगर अजूनही आहेत. यशवंत त्यांनाच विचारतात,

डोंगरांनो, का उभे? सांगाल का तुम्ही मला
तीनशे वर्षांचिया पूर्वील इथला मामला

फार सुंदर बोलले राजकवी. गुरुवर्य डॉ. प्रभाकर मांडेसरांनी तेव्हाच्या आम्हा कवींच्या कवितांचा प्रातिनिधिक संग्रह 'अर्घ्य' संपादित केला होता. त्याचे प्रकाशन डाकबंगल्यावर झाले, जिथे कविवर्य थांबले होते. तेव्हा काढलेला फोटो अजून माझ्या संग्रही आहे.

नवकाव्याच्या वादळाने पूर्वीच्या, विशेषतः रविकिरण मंडळाच्या कवितेबद्दल अकारण दूषित पूर्वग्रह निर्माण झाले आहेत. रविकिरणांची कविता आधुनिक मराठी कवितेचा एक महत्त्वाचा कालखंड व्यापणारी कविता आहे. त्या परिप्रेक्ष्यातून तिच्याकडे पाहिले पाहिजे. नवकाव्याच्या आकलन आणि मूल्यमापनाच्या कसोट्या

लावणे चूक आहे. त्यामुळे रविकिरण मंडळाचा काळ आणि कार्य या दोन्हींवर अन्याय होतो.

विसाव्या शतकाचा पूर्वार्ध हा मराठीत रविकिरण मंडळाचा काळ होता. महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी घडून गेलेले प्रबोधन, त्यातून उदयाला आलेला सुधारणावाद आणि पाश्चात्त्य जीवनशैली व साहित्य यांच्या प्रभावातून एक नवी जाणीव निर्माण झालेली दिसते. भारतीय स्वातंत्र्यलढा टिपेला पोचल्याचाही हाच काळ. समाजात सुधारणांचे वारे वाहत होते. शिक्षणाबद्दलचे प्रेम आणि प्रमाण वाढत होते. युवक-युवतींमध्ये पूर्वी नव्हती एवढी मोकळेपणाची जाणीव वाढत होती. नाट्य, संगीत, कला, निसर्ग यांबद्दलचे आकर्षण वाढत होते. सुशिक्षित आणि सुसंस्कृत माणसांचा मोठा वर्ग तयार होत होता. पाश्चात्त्यांकडून आलेले रोमँटिसिझमचे तत्त्वज्ञान हा यशवंतादी रविकिरणांच्या कवितेचा वैचारिक आशय होता. त्यासाठी हे तत्त्वज्ञान थोडक्यात समजून घेतले पाहिजे.

रोमँटिसिझम ही युरोपातील व्यापक, दीर्घकाळ चाललेली विचारधारा आहे. त्यातही इंग्लंडमध्ये रोमँटिसिझमने प्रामुख्याने वाङ्मयक्षेत्रावर प्रभाव गाजवला. त्याचा प्रत्यक्ष परिणाम इंग्रजी काव्यपरंपरेवर दिसून येतो. गंमत म्हणजे रोमँटिसिझमचा मराठी साहित्यावर प्रभाव पडला तो इंग्रजी वाङ्मयातील रोमँटिसिझमचे महत्त्व नष्ट झाल्यावर! १८५७ साली सुरू झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात जे निरनिराळे इंग्रजी लेखक होते, त्यात तत्कालीन रोमँटिक कवींचाही समावेश होता. 'गोल्डन ट्रेझरी'तील (संपादक फ्रान्सिस टर्नर पॉलग्रेव, १८६१) कवितांसारखी कविता मराठीत मराठीतले कवी लिहू लागले. त्यामुळे मराठी कवितेत नवे पर्व सुरू झाले.

१९२०च्या दरम्यान यशवंतांनी कवितालेखनाला आरंभ केला. त्यावेळी नवयुग व मनोरंजन ही ललितसाहित्य प्रसिद्ध करणारी दोनच मासिके होती. प्रारंभी त्यांनी तारकानाथ या टोपणनावाने कविता प्रसिद्ध केल्या. परंतु वर्षभरात त्यांनी ते टाकून यशवंत हे नाव घेतले. १९२१ साली बडोदे येथील साहित्यसंमेलनात त्यांचे नाव आणि कविता प्रथमतः गाजली. नरसिंह चिंतामण केळकर या संमेलनाचे अध्यक्ष होते. 'रक्ताचे अर्घ्य' ही कविता त्यांनी या व्यासपीठावरून गायिली. त्याच दिवशी संध्याकाळी बडोद्याच्या महाराणीसमोर कविता वाचण्यासाठी काही निवडक कवींना निमंत्रित करण्यात आले होते. त्यात यशवंत होते. बडोद्याच्या महाराणींना उद्देशून त्यांनी 'स्वातंत्र्यलक्ष्मीस मुजरा' ही कविता वाचली. पारतंत्र्याच्या काळात बडोदे संस्थानाकडे स्वातंत्र्याचे प्रतीक म्हणून पाहिले जात होते. तरीही देशाच्या पारतंत्र्याबद्दल मराठी कवितेत उमटलेला पहिलावहिला हुंकार म्हणून या कवितेकडे पाहता येईल. या ओळी पहा,

*दऱ्याखोऱ्यातला आला कवी हा खास दर्बारा*
*मराठ्यांच्या महालक्ष्मी, तुला घे शाहिरी मुजरा*
*जगाचा मानितो स्वामी स्वतःला मी महामानी*
*तुझ्या धामी, तुझ्या कामी परन्तू दास हा मानी*
*असे शास्ता जनांचा मी परी माई तुझा भाट*
*दिपावे विश्व वाणीने तुझ्या येथे न तो थाट*
*नभीच्या तारकाराशी पदाघाते झुगारीन*
*परी स्वातंत्र्यलक्ष्मी गे तुझ्या पायी सदा लीन*

यशवंतांच्या कवितेतून (आणि रविकिरण मंडळाच्याही) आधुनिकतेचे रंग असलेले वास्तव प्रथमच प्रकट होत होते. तोही एक प्रकारचा रोमँटिसिझमच होता. जे वास्तव या कवितांमधून प्रकटत होते, त्याला साजेशी अशी यशवंतांची शैली होती. वास्तवसन्मुख होण्यासाठी तिला विशेष आटापिटा करावा लागत नव्हता. ती प्रांजळपणाने व्यक्त होत होती. किंबहुना स्वतःच्या अवतीभोवतीच्या जगाचे भान तिच्यातून सुचित होत होते.

*'आई' म्हणोनि कोणी*
*आईस हाक मारी*
*ती हाक येइ कानी*
*मज होय शोककारी*
*नोहेच हाक, माते*
*मारी कुणी कुठारी*
*आई कुणा म्हणू मी?*
*आई घरी न दारी!*
*ही न्यूनता सुखाची*
*चित्ता सदा विदारी*
*स्वामी तिन्ही जगांचा*
*आईविना भिकारी.*

यशवंतांच्या आधी आईवर कविता लिहिल्या गेल्या नव्हत्या असे नाही. यशवंतांनी चितारलेली आई पारंपरिक अंगाईगीते किंवा पूर्वसुरींनी लिहिलेल्या 'आई'विषयक कवितांपेक्षा (उदा. *'नीज न ये तर गीत म्हणावे'*) पृथगात्म आहे. या कवितेने इतिहास घडवला. माधव ज्यूलियनांच्या आनंदकंद वृत्तात लिहिलेल्या '*प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधू आई*'पेक्षा त्याच आनंदकंदात लिहिलेली यशवंतांची कविता प्रासादिक आहे. उगीच नाही 'श्यामची आई' या चित्रपटात आचार्य

अत्र्यांना आईच्या मृत्यूचे श्यामला झालेले दुःख दाखवताना 'यशवंतांच्या आई' कवितेचा आधार घ्यावा वाटला!

यशवंतांची कविता लोकप्रिय होण्याचे एक कारण त्यांनी बोलीभाषेच्या जवळ जाणारी, स्वाभाविक आणि थेट अर्थ व्यक्त करण्यावर भर देणारी शैली जाणता-अजाणता आपल्या कवितेत आणली. आधुनिकतेचा रंग असलेल्या वास्तव चित्रणाला साकारताना ही शैली उपयुक्त ठरत होती. ही कविता स्वतःच्या अवतीभोवतीच्या जगाचे चित्रण करीत होती. त्यामुळे तिचा भर स्वाभाविकतेवर होता.

इंग्रजीतील काव्यप्रकारांवरून मराठीत तशा कविता लिहायच्या, ही एक प्रवृत्ती यशवंतांसह रविकिरणांमध्ये दिसते. इंग्रजीतील पॅस्टरल पोएट्रीवरून मराठीत जानपदगीतं या मंडळींनी लिहिली असे म्हणता येईल. १९३०च्या सुमाराला म. गांधींनी 'खेड्याकडे चला' हा संदेश दिला आणि त्याचे स्वागत मराठीतील मध्यमवर्गीय लेखकांनी विशिष्ट पद्धतीने केले. त्यांत यशवंत आघाडीवर होते.

यशवंतांच्या 'न्याहारीचे गाणे' आणि 'प्रेमाची दौलत' या दोन कवितांमध्ये ग्रामीण जीवनातला बाह्य तपशील आलेला असला तरी या दोन्ही कवितांमध्ये प्रेमाचेच रोमँटिक चित्रण आहे. 'न्याहारीचे गाणे' या कवितेत भल्या पहाटे शेतावर गेलेल्या नवऱ्यासाठी न्याहारी घेऊन जाणारी बायको मैतरणीला तिचा वेग वाढवायला सांगते आहे. कारण तोपर्यंत कामात गढून गेलेल्या नवऱ्याच्या हाताने नांगराचे बैल सुटले की त्याची नजर तिला शोधायला लागेल आणि त्याक्षणी जर का ती नजरेस पडली नाही, तर त्याची मर्जी खप्पा होणार आहे. असे झाले तर '*उरी रुतल माझ्या सुरी*'. तेव्हा लवकर जायला पाहिजे. न्याहरी केल्यानंतरही घामानं डबडबलेलं त्याचं तोंड तिला फिरफिरून पाहावेसे वाटते. घामाच्या थेंबाने डबडबलेल्या त्याच्या तोंडाला दाण्यांनी भरलेल्या कणसाची उपमा दिलेली आहे. सकाळची वेळ, नांगर सोडल्यानंतर न्याहरीही झाली तरीही हे 'तोंड' घामाने थबथबलेले कसे राहते, हा या कवितेतील अनुत्तरित प्रश्न आहे. कष्टकऱ्याचे तोंड म्हटले की कवीला ते घामाने ओथंबलेलेच पाहिजे असा त्याचा अर्थ! एकंदरीत, कष्ट, रांगडेपणा, निसर्गसान्निध्य, प्रियदर्शन आणि प्रेम या मूल्यांचे एक व्याजरोमँटिक चित्र यशवंतांनी ग्रामीण तपशिलाच्या साहाय्याने रेखाटले आहे.

यशवंत, गिरीश या रविकिरण कवींपर्यंतच्या कवितेत जानपद जीवनाचे कोणतेही वास्तवदर्शन घडत नाही. या कवींनी आपल्या एकूणच सगळ्या कवितांमध्ये मध्यमवर्गीय कौटुंबिक भावभावनांचे साधे चित्रण केले. ही निरनिराळ्या विषयांवरची निरनिराळ्या कौटुंबिक नात्यांबद्दलची कविता लिहिण्याची अहमहमिका त्यांच्या संवेदनशीलतेचा

नीटसा आविष्कारच त्यांच्या कवितांतून घडू देत नाही. या परिस्थितीत ग्रामीण संवेदनेचे अस्सल दर्शन त्यांच्या कवितेतून घडावे अशी अपेक्षा केल्यास निराशाच पदरी येते. जानपद गीतांमधली या कवींची मुशाफिरी इंग्रजीतल्या पेस्टोरल पोएट्रीचे अनुकरण करण्याच्या मोहापायी आणि विषयांची विविधता आणण्याच्या हव्यासापायी घडली असावी.

इंग्रजी कवितेचा आणखी एक प्रभाव म्हणून त्यांच्या पद्धतीने 'लिरिक्स' लिहिताना यशवंतादी कवी दिसतात. लिरिकसाठी कवी नारायण वामन टिळकांनी वैणिक हा शब्द योजला आणि डॉ. सुधीर रसाळांनी तो रूढ केला आहे. यशवंतांनी इंग्रजी लिरिक्सचे केवळ अनुकरण केले असे नाही, तर भा.रा.तांब्यांची वैणिकची परंपरा पुढे नेली असेही म्हणता येईल.

*तुझ्याकडे पाहतो पुन्हा पुन्हा*
*हा काय गडे माझाच गुन्हा*

किंवा

*ते हवेत माझे मला*
*सखे, परि भोवती सदा गल्बला*

किंवा

*सखे ग, प्रशांत किति यामिनी*
*ही तशीच जलवाहिनी*

तांब्यांच्या कवितांना ध्वनिमुद्रिका होण्याचे भाग्य उत्तरकाळात लाभले, तेवढे यशवंतांच्या वाट्याला आले नसेल. पण वैणिक कवितेचे म्हणून एक सौंदर्य आहे, ते यशवंतांनी लिहिलेल्या वैणिक कवितेने आविष्कारातील नावीन्याच्या अंगाने रसिकापर्यंत पोचवले असे निश्चितपणे म्हणता येईल. Lyrical Poetry ही आधुनिक रोमँटिक कवितेची मूळ प्रकृती होती. ती ठासून स्पष्ट केली जाऊन सुनीत, नाट्यगीत इत्यादी काव्यप्रकार ही भावगीताचीच रूपे आहेत, हे धरून काव्यचर्चा सुरू झाली. भावगीत ही आधुनिक कवितेची खरी प्रकृती आहे व आधुनिक काव्याची आधुनिकता तिच्या या वैशिष्ट्यात मुख्यतः सामावलेली आहे याची अंधुक जाणीव यशवंतादी कवींना होती. हा विचार मांडताना प्रा. रमेश तेंडुलकरांनी पुढील ओळी उद्धृत केल्या आहेत.

*पथी चालता पडती तुझी किती संथ कोमल पाउले*
*जग मागुनी, पुढुनी तुला मुरडून पाहत राहिले*

यशवंतांच्या या कवितेत अभिव्यक्तीमधील नावीन्य एकदम निराळं वाटलं असलं पाहिजे, असा निर्वाळाही ते देतात.

*वाढू दे कारागृहाच्या भिंतीची उंची किती*
*मन्मना नाही क्षिती.*
*भिंतीच्या उंचीत आत्मा राहतो का कोंडुनी?*
*मुक्त तो रात्रंदिनी!*
*भक्तिला जो पूर आला, वाढतो तो अंतरी*
*पायरीने पायरी*
*फत्तरांच्या या तटांनी ओसरावा काय तो?*
*सारखा फोफावतो.*
*अंजनीच्या बाळकाने सूर्यबिम्बा ग्रासिले*
*मन्मनी ते बिंबले.*

ही अभिव्यक्ती विनायक, माधव, टेकाडे, तिवारी इ. कवींच्या राष्ट्रीय कवितांहून एकदम वेगळी वाटणारी होती.

१९५० हे वर्ष आणि त्यावर्षी मुंबईला झालेले अ. भा. साहित्यसंमेलन राजकवी यशवंत आणि मराठी साहित्य या दोन्ही दृष्टीने विशेष अर्थपूर्ण होते, असे मला वाटते. नवकाव्य आणि नवसाहित्याची पहाट झाली होती. बाळ सीताराम मर्ढेकर याच संमेलनात काव्यशाखेचे अध्यक्ष होते आणि या संमेलनाचे अध्यक्ष होते यशवंत दिनकर पेंढारकर! कवी यशवंतांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात नवकाव्यावर प्रतिकूल टीका केली आणि मर्ढेकरांनी भावनानिष्ठ समानतेचा विचार मांडला. माधव ज्यूलियनांच्या कितीतरी नंतर म्हणजे चौदा वर्षांनी यशवंतांना हा मान मिळाला. एका परीने मराठी रसिकतेने रविकिरणांना दिलेली ही मानवंदनाच होती.

आणखी एक. रविकिरण मंडळामध्ये माधव ज्यूलियन हे रवी होते आणि बाकीचे सगळे किरण, हे विधान मला मान्य नाही. यशवंतांचे काव्य तितकेच महत्त्वाचे आणि तोलामोलाचे आहे. त्यांनाही किरण म्हणण्याने त्यांचे अवमूल्यन होते असे मला वाटते.

**– प्रा. विश्वास वसेकर**
भ्रमणध्वनी : ९९२२५२२६६८

**वाचक, वर्गणीदार यांना नम्र विनंती**

'साहित्य' त्रैमासिक दर्जेदार लेखनाला प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न करत आले आहे. यातील सातत्य टिकवण्यासाठी लेखनाची जशी गरज असते तशी वाचकाचीही गरज असते– विचार व साहित्यकला यांच्या सृजन–संवर्धनासाठी आपल्यासारख्या वाचकांची, वर्गणीदारांची 'साहित्य'ला गरज आहे – वर्गणी कुठल्याही अंकापासून भरता येते.

# दाणापाणी

## विलास सिंदगीकर

यंदा मनाजोगा पाऊस पडलाच नाही. फकस्त एक मिरगाची सर तेवढी पडली. त्यासरशी पावसानं तोंड दाखविलं न्हाई. १९७२च्या दुष्काळापेक्षाही भयानक दुष्काळ पडला होता. म्हणून गावोगावच्या विहिरीही आटल्या व्हत्या.

दिवसेंदिवस सूर्य नवतेज घेऊन उगवू लागला. सावल्या हद्दपार होऊ लागल्या. सूर्याला नवती आली होती. सूर्य कात टाकलेल्या नागावाणी फणा काढून फुत्कारल्या–सारखं आग ओकीत होता. जनुकाही जमीन चुलीवरच्या तव्यावाणी तापत होती. इंगोळझार वातावरण शुष्क झालं होतं. उकळत्या पाण्यातून वाफा निघाव्या तसं पाण्यातून गरम वाफा उसळत होत्या. दिवसरात्र सारखीच भासत होती.

माणसं, प्राणी आणि पक्षी दिवसभराच्या उन्हाच्या झळांनी भाजून निघत होता अन् रात्रीला उपासाचं रताळं उकडल्यासारखं उकडून निघत होता. भाजून निघत होता वांग्यावाणी ठिक्कर. चांगला पाऊस पडला नसल्यामुळे उभा डोंगर नवरा मेलेल्या रंडक्या बाईवाणी उघडा–बोडका झाला होता. उभी सृष्टी पानं गळून पुरती नगूळी झाली. म्हणून विसाव्याला बसायला सावल्याही राहिल्या नव्हत्या.

दावणीला बांधलेली जनावरं, खुराड्यातल्या कोंबड्या, पटकीचा रोग येऊन पटापट माना मोडून मरून पडाव्या; तसं गावोगावच्या दावणीच्या दावणी बसत होत्या. गुरंढोरं पटापटा माना टाकीत गोठ्यात टाच्या घासूनघासून तडफडून जीव कोंहीत होती. बैल, गाय आणि म्हैश यांचे सांगाडे डोंगरदरी, नदीनाल्यात पडून वाळत होते. जंगलात झाडीच नसल्यामुळे गिधाड पक्षी नामशेष झाला होता. म्हणून कोल्ह्याकुत्र्याची चंगळ झाली होती. तरीही देशात कधी नाही ते दूरच्या देशातून गिधाडं येऊन, त्या जनावरांना खाऊन निघून जात होती. पक्षीही पाण्यावाचून मरून पडत व्हते. गावची माणसंही कोरडंच रडत होती. कुनबी लोकांनी तर गुराढोरांच्या गळ्यात चिठ्ठ्या बांधून देशावर सोडून दिलं होतं. गरीबाची हालात तर पुसूच नका! हगणदारीगत त्यांचं जिणं झालं होतं. त्या गावातील नाथपंथीय बहुरूपी

लोकांची परिस्थिती अत्यंत नाजूक झाली होती. त्यातल्या त्यात रेणुका काळेची हालत जास्तीची झाली होती. तिचं लेकरू आजारी होतं. त्यामुळे तिला गावात जाऊन भीकही मागून आणता येत नव्हतं.

त्या गावात सुमारे पाचपंचवीस-तीस भराडी जमातीची कुटुंबं राहत होती. या कुटुंबाचा फावल्या वेळात बहुरूप्याची सोंगं घेण्याचा परंपरागत व्यवसाय. या कुटुंबाच्या पाचवीलाच अठराविश्व दारिद्र्य पुंजलेलं. कुण्याही कुटुंबाकडे उदरनिर्वाहाचं साधन नाही. गावपरिसरातील, शेतातील मजुरीची कामं संपली की पोटाची खाचखळगी भरण्यासाठी बहुरूप्याची विविध सोंगं घेऊन गावोगाव भटकंती करायची. बहुरूप्याची भटकंती करून भिक्षा मागत- चार पैसे मिळत असे. ही जमापुंजी करून गावाकडे परतायचे. गावात मिळेल ते काम करून कुटुंबाची गुजरान करायची, असा त्यांचा आवडता उद्योग होता; पण गावावर दुष्काळाची शोककळा पसरली होती. त्यामुळे त्या भटक्यांना गाव सोडून जाण्याशिवाय पर्याय नव्हता. पण रेणुकाचा जीव लेकरात गुंतला होता. लेकरू आजारी असल्यामुळे तिच्या मनात सारखी उलथापालथ सुरू झालेली होती. अन् झालंही तसंच वाईट... रेणुकाबाईच्या लेकरांचं-म्हादूचं तोंड उघडंच राहिलं...! लेकराचं मढं मांडीवर घेऊन आक्रोश करून रडली. मग बिरादारीच्या लोकांनी त्या लेकराला मूठमाती दिली. रेणुकाबाईचं जग उघड्याबोडक्या जंगलासारखं उद्ध्वस्त झालं.

झुंजूमुंजू झालं. बिरादारीची लोकं देशावर जायला उठली. ते लोक सामानाची आवराआवर करून निघण्याच्या तयारीला लागले; पण रेणुका तयार झाली नाही. कारण तिचा जीव लेकरात गुंतला होता. म्हणून तिची समजूत घालीत दादू देशमुख तिला म्हणाला,

''रेणुका, त्याच्या जिणगाणीत दाणापाणीच इथपस्तूर व्हता. त्येचं आयुष्यच तितकं व्हतं. पाण्याचा बुडबुडा फट्कन फुटला. त्याला तू तरी काय करणार व्हतीस?''

''मामाजी, मग म्या आता काय करू? कुणासाठी जगू?''

''भाडीचा, कमी आयुष्याचा निघाला बघ. आता उगच दुचित बसून कायबी उपेग न्हाई.''

''म्या जगून तर उपेग काय हाय?'' ती रडू लागली.

''मग इथं ऱ्हावून तुझं लेकरू तुला वापीस मिळणार हाई का?''

बिरादारीच्या समद्या गडीबायकांनी तिला धीर दिला. अन् तिला देशावर घेऊन जायला तयार केले.

तसं लोक म्होरं निघून गेली. तीही धडप्यात सामान बांधून गठूळं डोक्यावर

घेऊन शहराच्या दिशेनं वाट तुडवत निघाली.

नाथपंथीय भराडी भटके लोक एक-एक गाव मागे टाकत पुढं निघाली. त्यांच्या पोटात अन्नपाणी नसल्यामुळे आग पडली होती. म्हणून त्यांनी एका डोंगरदरीत काही पक्षी-प्राणी मारून खाल्ली. भुकेपुढं कुणाचं काही चालत नसतं. कारण प्राचीन काळी युद्धात राजा-महाराजांनी घोडे मारून खाल्ले होते. ही माणसे जितेपणीच मरण जगत होती. म्हणून पोटाची गार विझवण्यासाठी किडा-मुंग्यावाणी जीवन जगत भटकत फिरत होती. शंभरसवासे मैल अंतरावरून ते लोकं शहराच्या एका भागात उतरली.

शहराला लागूनच फुलवाडी नावाची वसाहत बसवली होती. त्या शहराला हा फुलवाडीचा विभाग नव्याने जोडला होता. त्या फुलवाडीला लागूनच आदर्श नगर, राम नगर आणि त्यानंतर ठाकूर नगर बसले होते. त्यापुढे सागरासारखं महाकाय शहर. फुलवाडीमध्ये ते लोक पालं ठोकून तीन दगडाची चूल मांडून राहू लागले. ते लोक ज्या फुलवाडी नगरात उतरले होते, त्या गल्लीत वाहनांची आणि माणसांची वर्दळ थोडी कमीच होती. त्यामुळे त्यांना त्या मोहल्यात राह्यला काहीच अडचन नव्हती. कारण तो विभाग विकसित झाला नव्हता. काळा धंदा करणारे लोक जागा घेऊन ठेवत होते. तिथं बंगले कमी आणि झोपडपट्टीच जास्त निर्माण झाल्या होत्या.

नाथपंथीय भराडी लोकांचा दिनक्रम सुरू झाला. ते लोक दररोज एक नगर, एक गल्ली, एक मोहल्ला भीक मागून आणून जगू लागले. ठाकूर नगर सोडलं तर सर्व नगर नव्याने विकसित होत होते. चार-पाच गल्ल्यांच्या नंतर ठाकूर नगर होते. ठाकूर नगर गाडीमोटार आणि वस्तींनी गजबजलेला भाग. ठाकूर नगर शहराचा मुख्य भाग झाला होता. त्यामुळे तेथील सर्व लोक नोकरीधंद्यात पूर्णपणे गुंतलेले होते. प्रत्येकाच्या सुसज्ज बंगल्यासमोर सुंदर बाग आणि चारचाकी गाडी थांबलेली होती. प्रत्येक माणूस आनंदाने आपापल्या कोशात मग्न होता.

पण त्या ठाकूर नगराला अचानक कुणाची दृष्ट लागली. कोण जाणे! त्या गल्लीची झोप उडाली. मध्यरात्रीनंतर भामटे लोक अंगाला तेल लावून त्या गल्लीत येऊन महिला-मुलींवर अतिप्रसंग करून, धुमाकूळ घालून, लुटमार करून पसार होत होते. ही अफवा होती, की खरं होतं हे कुणालाच माहीत नव्हतं; पण सर्व नागरिक दहशतीखाली वावरत होते. त्यामुळे त्या नगरातील काही शहाणे लोक एकत्र जमले. त्यातील एकाने शक्कल लढविली. तो म्हणाला,

''आपण रात्रीला गस्त घालुया.''

''पण कसं घालायचं?'' दुसरा उत्तरला.

तिसरा म्हणाला,

''दररोज दहा-पंधरा लोक मिळून पहाटे पाच वाजेपर्यंत जागे राहून फिरुया. ज्याला कुणाला गस्तीत यायचे नाही, त्याने बदलीवर माणूस द्यायचा. ही कल्पना सर्वांना पटली. आवडली म्हणून त्या दिवसापासून नागरिक स्वतःच रात्रीला गस्त घालीत फिरू लागले. गटागटाने एकत्र येऊन पहारा देऊ लागले. कारण या भागातील महिलांच्या अत्याचारांत कमालीची वाढ झाली होती. दोन-तीन महिन्यांपूर्वी त्या गल्लीतील महिलांनीच बंटी यादव या नावाच्या गुंडाला ठार मारलं होतं. त्यामुळे हा भाग शांत झाला होता; पण तीन-चार महिन्यांनंतर बंटी यादवच्या गुंडांनी ठाकूर नगरात उपद्रव माजवला होता. त्यामुळे संपूर्ण नगर अशांत झालं होतं, असा त्यांचा समज झाला होता. काहीही असो; पण रात्रीला त्या नगरात काळं कुत्रसुद्धा फिरकत नसे. चोरांच्या चोरीपेक्षा अफवेमुळेच लोक जास्त परेशान झाले होते. संशयाचे भूत मानगुटीवर बसल्यावर माणसांना काहीही समजत नसते. पण दोन दिवसांपूर्वी एका महिलेच्या घरात चड्डी-बनियन घातलेला एक तरुण भामटा शिरला होता. त्यामुळे लोकांचा चोरांवर भरोसा बसला होता. रात्री-बेरात्री त्या भागात कुणी अनोळखी व्यक्ती गेल्यास, लोक त्याची कोणतीही चौकशी न करता त्याला बेदम बदडीत होते. त्या भामट्याची गोष्ट काही लोक तिखट-मीठ लावून सांगत फिरत होते. ते लोक महिला-मुलीवर कसे अत्याचार करतात, याचाच पाढा वाचला जात होता. म्हणून त्या दहशतीखाली लोक वावरत होते. त्यात नव्याने शहरात भीक मागून पोट भरण्यासाठी आलेल्या नाथपंथीय भराडी लोकांची भर पडली.

भल्या पहाटे नाथपंथीय लोक उठले. त्यांनी भिक्षा मागण्याचा पोशाख परिधान करू लागले. पुंडलिक सावंतने भोळ्या शंकराचं रूप घेतलं, तर विठू सावंत पार्वतीचे कपडे नेसला. दादू देशमुख हानुमान झाला. बाळू शिंदे गांधीजी बनला. शिवाजी राणेंनी हिजड्याचा पेहराव केला. पाचपैकी तिघांनी देवाची रूपं घेतली, तर दोघांनी वेगवेगळी रूपं घेतली. तोपर्यंत सूर्य उगवला. उजाडलं. प्रत्येकाचा चेहरा स्पष्ट दिसू लागला म्हणून त्यांनी तोंडावर रंगरंगोटी करून देवाच्या रूपाला आकार दिला. तसं विठू सावंत फुटक्या भिंगात बघत भावाला म्हणाला,

''पुंडादा, म्या कसा दिस्तोरंऽ मर्दाऽऽ!''

''कसा म्हंजी? आरं, तू लई झकास दिस्तोस.'' पुंडलिकनं विठूच्या रूपाची स्तुती केला. तसं दादू देशमुखना त्यांनी विचारलं.

''म्या हुबेहुब रामाचा भगत हानुमान दिस्तो का न्हाई?''

''आरं बाबाऽ तू लई भारी दिस्तोस. परत्येक्षात हानुमानबी तुला बघायला आला तर त्येला वळखू येणार न्हाई.'' बाळ शिंदेनं आगावू माहिती सांगितली.

''वाऽ! तुमी दोघंबी लई भारी दिस्ताव बघा.'' शिवाजी राणे उत्तरला.

''खरंच...'' पुंडलिक आणि विठू बोलले.

''मग म्या कशापाई खोटं बोलू. आपुण चूक्ते लोक देवावाणी दिसत हाई.'' शिवाजी राणेनं समद्यांना सांगून टाकलं.

रेणुकाबार्सचा धाकटा दीर गणेश काळे तिला म्हणाला,

''रेणुकाभाभी, तू तयार झालीस का न्हाई? ठाकूर नगर लई लांब हाई. जल्दीनं गेलं म्हंजी सव्यांना येरवाळी वापीस येता येल.'' आणि तो पुन्हा सर्वांना म्हणाला,

''सीताकाकू, इंदरवहिणी, सुमनमाय यांचं झालं का न्हाई!''

''आमी समद्याजनी तयारच होऊन निघालाव. बरीक आज कंच्या गल्लीत जायचं हाय की.''

''ठाकूर... गल्ली...!'' तो उत्तरला.

सर्वांनी ठाकठीक पोशाख करून ठाकून नगरचा रस्ता धरला.

सकाळी आठ-नऊच्या दरम्यानची गोष्ट. रेणुकाबाई आणि तिच्या बरादारीच्या बायकांनी ठाकूर नगरच्या गल्ल्या धरल्या, तर पुरुषांनी दुसरा भाग धरला.

रेणुकाबाईनं नक्षीदार शिवलेल्या गोधडीचं छोटं गाठोडं डोक्यावर घेतलं होतं. डाव्य हातात सुई, दोरा, मणी, कंगवा-फणी, माळी असलेला जुडगा घेतला होता. उजव्या हातानं डोक्यावरचं गाठोडं सावरीत एका बंगल्यासमोर आली. त्या बंगल्याम्होरं उभं ठाकून मोठ्यानं तालासुरात म्हणाली,

''हिरकनबाय... गवळणबाय... लक्ष्मीबाय काळीपोत घे. काळ्या लेकुराला दीपट मणी घे. सोन्याच्या माय लेकुराला खंडोबाचा काळा सुत घे. घे गऽ माय... तुझ्या लेकुराला बरं राहिलं. घे माऽय घेऽऽ!''

तसं सीताकाकू ओरडून म्हणाल्या,

''दाताचं दातवन घ्या. रेणुका मातेचं कुंकू घ्या. घ्यावं...वं...माय...घ्या.'' सीताबाईचं बोलणं संपल्याबरोबर इंदिराबाई म्हणाली,

''जमकाय जुडवा बमजान जू... रोटी-भाजी वाढताय बमजान तू... बमजान जू माय... बमजान जूऽ''

त्या सर्वजनी भिक्षा मागू लागल्या. पुन्हा तालासुरात भीक मागू लागल्या,

''पिठू वाढमाय बमजान जूऽ! शिवाची माय वाढ. तुलापण लागेल वाढ.'' तसं रेणुकाबाईनं पुढचं बोलणं सुरू केलं. ती बंगल्यातील लोकांना उद्देशून बोलू लागली,

''माऽय... बंगल्यातले आय... देव... तुमचं भलं करो... येल मांडवाला

जावो.'' त्या भराडी बायका पोटतिडकीने ओरडून भीक मागत फिरू लागल्या. हातातील काळ्या मन्याची पोत, काजळडब्बी, कंगवा-फणी विकत घेण्याची लोकांना विनंती करू लागल्या. कान-नाक टोचून घ्या, म्हणू लागल्या. त्यांना आशा होती, की लोक काहीतर विकत घेतील? पण आता जग झपाट्याने बदलत होते. शहरात मोठमोठी मॉलची दुकानं उभी ठाकली होती. गल्लोगल्ली सौंदर्यप्रसादनाचे, वेगवेगळे जनरल स्टोअर्सचे दुकान थाटले गेले होते. त्यामुळे भराडी, वैदू आणि डवरी गोसवी बायकांच्या मालाला कुणी ढुंकूनही बघत नव्हते. म्हणून ठाकूर गल्लीच्या घरोघर जाऊन त्या शिळंपाकं अन्न मागून घेत होत्या.

तर दुसरीकडं पुंडलिक सावंत, विठू सावंत, बाळू शिंदे, दादू देशमुख आणि शिवाजी राणे यांनीही ठाकूर नगरचा कोपरा न् कोपरा भीक मागणं सुरू केलेलं होतं. त्यात पुंडलिक आणि विठू सावंत. एकीकडे त्यांच्यासोबत दादू देशमुख होता. शिवाजी राणे हिजड्याचं रूप घेऊन दुकानं मागत होता. तर बाळू शिंदे भर चौकात गांधीजींच्या पुतळ्यासारखा थांबून राहत होता. त्यातील देवाचं रूप घेतलेले तिथे एका बंगल्याच्यासमोर येऊन उभं ठाकून मोठ्याने ओरडून म्हणाले,

''महादेव-पारबती तुमच्या दारी आली हाईत. त्यांना दानधर्म करा. दारात आलेल्या देवांना रिकाम्या हाताने वापस पाठवू नका.''

त्या बंगल्यात कुणाचाही मागमूस लागेना. म्हणून त्या तिघांनी पुन्हा मोठ्याने बोलायला सुरुवात केली. पण त्या बंगल्यात एक स्त्री एकटीच राहत होती, ते त्यांना तरी काय माहीत? आपल्या बंगल्यासमोरचा गोंधळ ऐकून ती स्त्री बाहेर गेटजवळ आली. त्या स्त्रीला बघून ते तिथे बहुरूप्याच्या भाषेत देवाच्या अधिकारवाणीने म्हणाले,

''या... या... माता... या. तुमच्या दारात देव अवतरले हाईत. ते तुमाला कळत न्हाई का? या... या... देवाला पाचसे-दहजार रुपायची देणगी द्या. दानधर्म केल्याने पुण वाढते. न्हाईतर...''

ह्या बोलण्याने ती स्त्री घाबरली. तसं पाहिलं तर तिला घाबरण्यासारखं काहीच नव्हतं. कारण त्यांना कुणीही हजार-पाचसे रुपये भिक्षा म्हणून देत नव्हते. हे सर्वांना माहीत होतं. पण त्या लोकांच्या रीतिरिवाजाचा भाग म्हणून ते लोक बोलले होते. बहुरूपी लोकांचा अवतार बघून त्या बंगल्यातील स्त्रीला भीती वाटली. तिच्या मनात संशयाची भीती शिरली. म्हणून ती मोठ्याने चिरकली. ती मोठ्याने ओरडून बोलू लागली,

''वाचवाऽ धावाऽऽ चोऽऽऽर, चोऽऽऽर, पकडाऽऽऽ वाचवाऽ!''

घाबरलेली बाईमाणूस बघून पुंडलिक सावंत म्हणाला,

''आई, तुमी मोठ्याने चिरकू नका. आमी चोर न्हाईत. आमी भीक मागून खाणारे बहुरूपी हावत.''

त्या बाईचा आवाज ऐकून शेजारच्या बंगल्यातून लाकडाची फळी घेऊन एक भला मोठा माणूस बाहेर आला आणि म्हणाला,

''चोर कोठे आहेत?''

त्या महिलेने आरडाओरड करताच अफवांच्या विश्वात वावरणारी त्या वस्तीतील काही मंडळी वेषांतर करून आलेल्या भराडी लोकांच्या मागे लागली. त्यात तो भला मोठा माणूस त्यांच्यामागे धावत ओरडला,

''पळा... पकडा... ठार मारा साल्यांना... आता त्यांना सोडू नका.''

अन् बघताबघता प्रत्येक माणूस हातात काठी, फळी, लोखंडी रॉड, साखळी आणि फरशीचा तुकडा घेऊन त्या बहुरूप्याच्या मागे त्यांना ठार मारण्यासाठी धावू लागला. त्यांचा पाठलाग करू लागला.

त्या गल्लीतल्या बिथरलेल्या लोकांना बहुरूपी सोंग घेतलेल्या नाथपंथीय भराडी लोकांनी त्यांच्या सांकेतिक भाषेत जिवाला धोका असल्याचा इशारा केला. तसं ते बहुरूपी लोक जीव वाचविण्यासाठी जिवाच्या आकांताने पळू लागले. पुरुष लोक महिलांच्या वेषात असल्याचे आणि तेही पळून जात असल्याचे पाहून त्या भागातील प्रत्येक माणूस टोळक्याच्या झुंडीत सामील होऊ लागला. एका क्षणात सातआठशे लोकांचा जमाव त्या लोकांचा पाठलाग करू लागला. तसा त्यांच्यातील एक बहुरूपी पाय हेंडगाळून तोंडावर पडला. त्याला पकडून लोक मारू लागले. त्याला बोलायची संधीच लोकांनी दिली नाही. पुंडलिक सावंत लोकांना हात जोडून म्हणाला,

''चोर... साल्या... तुम्ही आतापर्यंत किती घरे लुटली आहेत? बंगल्यातल्या किती बायकापोरींची इज्जत लुटलीत? साल्यांनो, तुम्हा लोकांना ठार मारलं पाहिजे! तुमचा जगून काही उपयोग नाही.''

त्या जमावातील दुसरी व्यक्ती पुंडलिक सावंतला जमिनीवर पालथं पाडून लाथा-बुक्क्या मारू लागली.

''न्हाई... न्हाई... मालक... सायब... म्या चोर न्हाई. आमुचं लोक डाकू-लुटारू न्हाईत. बहुरूप्याचं सोंग घेऊन भीक मागून जगणं हा आमुचा पिढ्यान् पिढ्यापासूनचा धंदा हाय जी. आमुच्या मुलखात कोरडा दुकूळ पडलाय म्हून आलोय बघा.''

''चोर सुटण्यासाठी काहीही खोटं बोलत असतो. चोराचं काहीही ऐकून घेऊ नका.'' तिसरा उत्तरला, दगड, विटा, लाकडी फळी, लोखंडी गज आणि फरशीच्या

तुकड्यांनी पुंडलिकला त्यांनी ठेचून काढलं. तसं जमाव बाकीच्या बहुरूपी लोकांच्या मागे धावू लागला. ठाकूर गल्लीतील बाकीच्या बहुरूपी लोकांवर संतप्त जमाव सैतानासारखा तुटून पडला. कारण संशयाचे भूत मानगुटीवर बसल्यामुळे वेडंपिसं झालेल्या ठाकूर नगरातील जमावाने वेषांतर करून भिक्षा मागणाऱ्या दोन बहुरूपींची दगडविटांनी ठेचून निर्घृण हत्या केली. त्या ठिकाणी दारिद्र्य व भुकेनं क्रूर थट्टाच मांडली जणू! त्यांच्या महिलांचीही तीच गत झाली होती. फक्त बाळू शिंदे आणि शिवाजी राणे आकांताने पळत होते. कारण ते तरुण होते. बाळू शिंदे रक्तबंबाळ झाला होता. पण तो जिवाच्या भीतीने पळत होता.

आणि तो पळतापळता समोरून येणाऱ्या पोलीसगाडीला धडकून खाली पडला. पोलिसांनी बंदुकीची गोळी झाडून वैतागलेल्या जमावाला पांगवलं. पोलिसांनी त्याला संरक्षण दिलं. पोलीस आल्यामुळे एका बहुरूप्याचा तरी जीव वाचला. तीन पुरुष तर जागीच ठार मारले गेले. रेणुका आणि तिच्या साथीदार महिलांनाही मारून बेशूद करून टाकलं होतं. त्या सर्व मृतआवस्थेत पडल्या होत्या. वेगवेगळ्या वेशभूषा करून जोगवा मागत पोटाची टिचभर खळगी भरणाऱ्या नाथपंथीयांना चिडलेल्या लोकांनी ठार मारून टाकलं होतं. इथं गरिबीनं त्या बहुरूपी दळभद्री लोकांची नियतीनं क्रूर थट्टाच मांडली होती. जन्म घेतलेल्या प्रत्येक माणसाला जगण्याचा अधिकार आहे; पण इथं गरिबाचं जगणंच नाकारलं होतं. या घटनेला समाज, पोलीस आणि गरिबी जबाबदार होती, की शासन जबाबदार होते? याचं उत्तर कोणीही देऊ शकत नव्हतं. कारण पोलिसांनी वेळीच त्या भागात गस्त वाढवून दहशत संपवली असती; कधी नाही इतका दुष्काळ पडला नसता, ते लोक भटके गरीब नव्हते, तर ह्या तळहातावर पोट असलेल्या गरीब लोकांचा बळी गेला नसता.

पोलिसांनी त्या जिवंत लोकांना सरकारी दवाखान्यात भरती केलं. सात-आठ दिवसांनी त्यातल्या काही महिलांना होश आला. पण बाळू शिंदे आणि रेणुकाबाई काळेची जगण्यासाठीची झुंज सुरू होती. रेणुकाबाई काळे कोमात गेली आणि बाळूला काही दिवसांनंतर होश आला. पोलिसांनी बाळू शिंदेचा जबाब नोंदवून घेतला. तसं त्यांनी बाळू शिंदेला पहिला प्रश्न विचारला,

''सायब, आमी भराडी लोक हाय. आमच्या भागात दुकूळ पडल्यानं या मुलखात भीक मागून खायला आल्तो. तिकडं प्वॉट भरायला दाणापाणी सुदीक मिळत न्हाई. त्यापायी प्वॉट भरून खायला आलाव. इथं आमुच्या कुणीबी वळखीचं न्हाई. आमाला इथं येऊन फकस्त दोन-चार दिसंच झाली हाईत जी.''

''या भागातील लोकांचं असं म्हणणं आहे, की तुम्ही लोक दिवसभर श्रीमंत लोकांचे बंगले शोधत फिरत असता आणि रात्रीला घरफोड्या, खून आणि बलात्कार

करत फिरत असतात. हे खरं आहे नां?''- पोलीस.

तसं बाळू शिंदे म्हणाला,

''न्हाई... न्हाई... सायब, आमी लई गरीब लोक हाई. आमाला घरसुदीक न्हाई जी. बरीक मामलेदार सायबास्नी आमास्नी बहुरूपी सोंग करून खायचा परवाना दिला हाय बघा. आमी लोक गुन्हेगार न्हाई.''

फौजदार आणि पोलिसांनी फिरवून फिरवून अनेक प्रश्न विचारून बाळू शिंदेचा जबाब नोंदवून घेतला आणि निनावी गुन्ह्याची नोंद केली.

आपल्या किडूकमिडूक इज्जतीच्या संरक्षणासाठी केवळ संशय पिशाच्यामुळे पोटाची टिचभर खळगी भरणाऱ्या बहुरूप्यांना दाणापाण्याला हकनाक मुकावं लागलं. कुणाच्याही मनात त्यांच्याबद्दल मायेचा पाझर फुटला नाही. ते गरीब लोक हात जोडून खोटी प्रतिष्ठा जोपासणाऱ्या हृदय नसलेल्या लोकांना जीवदान मागत राहिले आणि नियतीनं त्या गरिबांचं दाणापाणीच संपवलं. 'खरंच... गरिबाचं जगणं असंच कस्पटावाणी असतं का? नाही... नाही... गरीब लोकही जगले पाहिजेत?' असं म्हणून फौजदार विजय बळी कामाला लागले. कारण त्यांना बाळू शिंदेला न्याय मिळवून द्यायचा होता...

**- विलास सिंदगीकर**

भ्रमणध्वनी : ९४२१३६९९४५

## श्रद्धांजली

| | | |
|---|---|---|
| मधुकर झेन्डे | विजय आव्हाड | दिलीप दोशी |
| डॉ. नारायणन | मुकुल देव | वसंत मोडक |
| प्रकाश भेंडे | वाल्मिक थापर | शेफाली जरीवाला |
| सनी थॉमस | दत्तात्रय गांधी | विजय पेंडसे |
| गिरीजा व्यास | दाजी पणशीकर | परशुराम बापट |
| माधव वझे | पार्थी घोष | प्रा. रमेश कोटस्थाने |
| विक्रम गायकवाड | वामनराव देशपांडे | कोटा श्रीनिवास राव |
| जयंत नारळीकर | फ्रेडरिक फोर्सिथ | बी. सरोजादेवी |
| विजय कारखानीस | अरविंद कुलकर्णी | फौजा सिंग |
| शरयू दफ्तरी | मारुती चितमपल्ली | धीरज कुमार |
| आशिष उबाळे | विवेक लागू | डॉ. दीपक टिळक |
| एम.आर. श्रीनिवासन | वसंत नाचणे | |

# माणुसकी

## डॉ. श्रीकांत पाटील

निकमवाडीच्या वरच्या टेकडीवर दहा-बारा घरांची वस्ती होती. रानामाळात काम करून, दूध विकून आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवण्यात त्यांची एक पिढी खपली होती. पण प्रगतीची कुठलीच वाट त्या वस्तीपर्यंत पोहोचली नव्हती. सकाळी तांबडं फुटल्यावर शानघाण आवरायचं. बाजूच्या वड्यावर जनावरं धुऊन आणायचीत. धारापाणी करायचं आणि फटफटीत झालं की दुधाच्या किटल्या घेऊन गावात यायचं. जणू वस्तीवरल्या माणसांची ही सवयच बनली होती.

गावात वस्तीवरून आलेला प्रत्येकजण सूर्य तापायच्या आत गरजेच्या वस्तू खरेदी करून परत वस्तीची वाट तोडून माघारी फिरायचा. पुन्हा दिवसभर राबून वैरणकाडी, रानातले काम करण्यात रमून जायचा.

''बाळू गावात जाऊन मेडिकलमधून तापाची गोळी घेऊन येतोस का?'' धोंडीनानानं विचारलं. नाना सकाळपासून तापानं फणफणू लागला होता. काल पावसात भिजल्यामुळे आणि रात्रभर गार वारं जोडत असल्यामुळे त्याच्या अंगात हिव भरलं होतं. त्यामुळे त्याला काही सूचेनासं झालं होतं.

''हे काय, जातो आणि आत्ता येतो बघा, नाना. काय अडचण नाही.''

''अरे पण, तू जाणार कसा?''

गावाचा रस्ता लांब असल्यामुळे नानांनी विचारलं.

''नाना, तुम्हाला कशाला पाहिजे? मी कसापण जाईन. तुम्हाला गोळी मिळाल्याशी कारण. द्या पैसे. हे काय, जातो आणि लागलीच गोळी घेऊन येतो.'' तसं बाळूने छपराच्या कुडाला टेकवलेली सायकल बाहेर काढली. धोंडीनानाकडनं पैसे घेतले आणि गावचा रस्ता धरला. रस्ता पार उखडून गेला होता. त्या रस्त्यावरून माणसाला धड चालता पण येत नव्हतं. त्याच्यात ह्यो बाबा सायकलवरनं निघाला. त्यालाही माहिती होतं. ह्या रस्त्याने जाणं जिकिरीचं काम हाय. तरीसुद्धा धोंडीनानाचं काही करून काम झालं पाहिजे, या एकाच विचारानं

भर दुपारी उन्हाची तिरीप सोसत त्यानं गाव जवळ केलं.

येताना खड्ड्यातनं, दगडा-धोंड्यातनं वाट काढताना त्याच्या हाडांचा पार खुळखुळा झाला. गावात आल्यावर त्याला बरं वाटलं. तसं त्यानं गती वाढवली आणि मेडिकल दुकान गाठलं. पाहतो तर काय, दुकानाचं शटर बंद होतं.

''च्यामारी, एक वाजला नाही तवर दुकान बंद?''

त्यानं दुकानाच्या पाटीवर असलेल्या नंबरवर फोन लावला. तसा पलीकडून आवाज आला,

''कोण पाहिजे तुम्हाला?''

''प्रताप माने का?''

''होय.''

''बोला, काय काम आहे?''

''अहो मी टेकडीवरच्या वस्तीतला बाळू बोलतोय. तापाची गोळी न्यायला आलतो.''

''अरे पण तुला वाचता येते का नाही? दुपारी बारा ते चार वाजेपर्यंत दुकान बंद असतंया असे लिहिलंय तिथं.''

''अहो मालक, धोंडीनानाला लय ताप आलाय. तापाची गोळी नाही मिळाली तर आणखी वाढंल. नाना झोपूनच आहे. तेवढी गोळी मिळाली तर बरं होईल.''

''अरे पण मी काय करू आता? जेवायला आलोय. जेवण झाल्यावर तासभर विश्रांती घेणार आणि बरोबर चार वाजता येणार बघ. मग काय करतोयस?''

''अहो बघा की, काय तर. मला गोळी द्या आणि निवांतपणी जेवा मग.''

''मला जमणार नाही. थांबायचं असलं तर थांब, नाहीतर बघ तुझं तू काय करायचं ते. मला चार शिवाय येणं होणार नाही.''

मालकाचं निर्वाणीचं बोलणं ऐकून बाळूला वाईट वाटलं.

काय माणसं असतात! दुकान उघडून गोळी द्यायला काय झालं होतं? दुसऱ्याच्या अडचणीला उपयोगी यायचं, त्यातलं काहीच माहीत नाही.

असा विचार करून त्यानं सायकल चावडीच्या पाराकडं वळवली. उन्हं चांगलीच तापायला सुरुवात झाली होती. रस्त्यावर चिटपाखरूही नव्हतं. आता धोंडीनानाला काय सांगायचं, या विचारानं त्याच्या डोक्यात प्रश्नांचं काहूर माजलं. गोळी न घेता माघारी गेलो तर ताप आणखी वाढेल. दुखणं बळावंल. दुकानदार काय चारशिवाय दुकान उघडणार नाही. तेव्हा आता काय करायचं? असा विचार करून त्यानं धोंडीनानाला फोन लावला,

''हॅलो, हॅलो, नाना मी बाळू बोलतोय.''

''हं, बोल की, का काय झालं? गोळी मिळाली का नाही?''

''नाही नव्हं, ते सांगण्यासाठीच फोन केलाय. दुकान बंद झालंय. दुकानदार काय चार शिवाय दुकान उघडत नाही म्हणतोय.''

''बरं मग, ये माघारी आता. इतका वेळ थांबून कशाला राहतोस?'' नानानं त्याला सांगितलं

''बरं नाना, तुम्ही काळजी करू नका. काहीतरी मार्ग निघतोय का बघतो मी.'' असं म्हणून बाळूनं फोन बंद केला.

काय न्हाय. गोळी तर मिळाली पाहिजे. नाहीतर नानाचा ताप आणखी वाढेल. या विचारानं तो अस्वस्थ झाला. तसं त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. कोरेगावला प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. तिथे आपल्याला नक्की औषध मिळेल. लांब आहे. पण काय इलाज नाही. असा विचार करून त्याने तडक कोरेगाव गाठले.

उन्हं वाढत होती. दवाखान्यात सामसूम होती. बहुधा कर्मचाऱ्यांची दुपारी जेवायची सुट्टी झाली असावी. बाजूच्या बाकड्यावर एक माणूस बसला होता.

बाळूनं त्याला विचारलं, ''इथली मंडळी कुठे आहेत?'' त्यानं पलीकडच्या खोलीकडे बोट दाखवलं. तसं बाळू तडक तिकडे गेला. दुपारची जेवणाची सुट्टी असल्यामुळे ती मंडळी एकत्र बसून जेवण करीत होती. बाळूला पाहताच त्यातील एकाने विचारले,

''काय हो, काय झालं?''

''काय नाही. मी बाजूच्या निकम वाडीतनं आलोय. आमच्या वस्तीवर धोंडीनानाला ताप भरलाय. गोळी पाहिजे होती.''

''अहो पण पेशंट कुठाय?''

''त्याला येता येत नाही म्हणून तर मी आलोय न्हवं.''

''का?''

''अहो आम्ही मळ्यात राहतोय. या-जायाला रस्ता पण नाही. मग म्हातारा माणूस कसा आणायचा?''

''बरं. कुठे वाऱ्यात वगैरे फिरलेले काय?''

''व्हय, काल ढोरं राखायला टेकडीच्या पलीकडच्या बाजूला गेलेले. त्यात सांज करून अवकाळी पावसाने झोडपलं. त्यात सापडलं नव्हं नाना. त्यामुळे आला असेल ताप.''

''ठीक हाय.''

आरोग्य केंद्रातील डॉक्टरने टॅबलेटचं एक सहा गोळ्याचं पाकीट बाळूकडं दिलं आणि सांगितलं, त्यातली एक गोळी सकाळी आणि एक गोळी संध्याकाळी घ्या. घाम जाईल. लक्ष ठेवा. घाम पुसून घ्या. ताप येईल कमी.

गोळ्यांचं पाकीट घेऊन बाळू झपाट्याने गावाकडे परतला. तिथून वस्तीकडे जाताना मात्र त्याची चांगलीच तागाटी झाली. तासाभरातच बाळू आलेला पाहून धोंडीनानाच्या बायकोला बरं वाटलं. त्यानं गोळ्यांचं पाकीट त्याच्या हातात ठेवलं.

नाना चादर पांघरून कण्हत पडला होता. त्याला झोप लागली होती.

''काय उघडलं का दुकान?'' पारूबाई-नानाची बायको तिनं विचारलं. ''ते चार वाजता उघडणार हाय.''

''मग ह्या गोळ्या कुठणं आणल्यास?''

''कोरेगावच्या आरोग्य केंद्रातनं.''

''आरं पण.''

''आरं पण, काय?''

''दुकान बंद आहे म्हणून आपण थांबून कसं चाललं! तडक कोरेगावला गेलो आणि दवाखान्यात डॉक्टरला सांगून गोळ्या घेऊन आलो.''

''बरं झालं बाबा.''

''काकू यातली एक गोळी आता ताबडतोब द्या आणि रात्री उशिरांनी दुसरी गोळी द्या. घाम जाईल. पुसून घ्या. नानाला बरं वाटंल.''

तसं तिने धोंडीनानाला हाक मारून जागं केलं.

''काय मिळालं का औषध?''

तसं पारूनं धोंडीनानाला सगळं सांगून टाकलं. आपल्यासाठी असल्या माझ्या उन्हात बाळूला सायकल मारत लांबपर्यंत कोरेगावला जावं लागलं. त्यामुळे कृतज्ञतेने त्याचे डोळे भरून आले. गोळी खाल्ली आणि परत तो आडवा झाला. बाळूही आपल्या घरी निघून गेला. पारूबाई नानाच्या उशालाच बसून राहिली. तासाभरात नानाला घाम यायला लागला. तसा ताप कमी होऊ लागला. सायंकाळी धोंडीनानानं गरमागरम वरणभात खाल्ला. त्यानंतर त्याला बरं वाटलं.

संध्याकाळी उशिरानं नानाचं हालहवाल जाणून घेण्यासाठी बाळू त्याच्या घरी आला. धोंडीनानाला बरं वाटायला लागले हे कळल्यावर त्यालाही आनंद झाला. बाळूनं वेळेवर औषध आणून दिल्याबद्दल आपलं वय विसरून नानांनी त्याला हात जोडले. ''हे काय नाना, हे माझं कर्तव्य आहे. आपण कुणाच्या तरी उपयोगी पडलो पाहिजे.''

''होय बाबा, हे खरं हाय. तुझ्यासारखी गुणी पोरं आहेत म्हणून माणुसकी टिकून आहे बघ.'' नानानं त्याला तोंड भरून आशीर्वाद दिला.

**– डॉ. श्रीकांत पाटील**

भ्रमणध्वनी : ९१७२७१६३४१

# वेदनेचा वेध घेणारे जी.एं.चे कथाविश्व...!

## डॉ. बिभीषण सातपुते

अलौकिक प्रतिभा लाभलेले, भाषेवर विलक्षण प्रभुत्व असलेले, वेदनेचा अंतिम वेध घेणारे, आपल्या शैलीचे वेगळे रूप घडवणारे व मराठी वाङ्मयात स्वतःचे स्थान निर्माण केलेले जी.ए. कुलकर्णी यांचे १० जुलै २०२३ला जन्मशताब्दी वर्ष समाप्त होत आहे. म्हणून स्मरण.

१९४५ ते १९६० हा कालखंड मराठी कथेच्या ऐन बहराचा काळ. भावे, गाडगीळ, गोखले, माडगूळकर हे मातब्बर कथालेखक समीक्षकांच्या अभ्यासाचे विषय झालेले होते आणि या कथाकारांनी घडवलेल्या कथा या वाङ्मयप्रकाराची चिकित्सा होऊ लागली होती. या मातब्बर कथालेखकांपैकी गंगाधर गाडगीळ हे नवकथेचे शिल्पकार मानले जातात. या बिनीच्या कथाकारापाठोपाठ कितीतरी अनेक नवे कथाकार उदयाला आलेले होते आणि नागर, ग्रामीण, गंभीर, विनोदी, वास्तववादी, काव्यात्म, दुर्बोध, तरल, संज्ञाप्रवाही, मनोविश्लेषणात्मक अशी विविध स्वरूपाची कथा प्रकाशित होऊ लागली होती.

जी.ए. कुलकर्णी हे अनवट वाटेवरचे एक श्रेष्ठ यात्रिक. त्यांनी अनवट राग आपल्या कथेमधून आळवला. त्यांच्या कथेचा 'मानवी करुणा' हा स्थायिभाव होता. त्यांच्या कथा या दीर्घकथेसारख्या– काव्यात्मकतेने ओथंबलेल्या. कथा महाकाव्य सदृश्य. मनाला खिळवून ठेवणाऱ्या. वाचकाला झपाटून टाकणाऱ्या. मानवी स्वभावाची विविधांगी चित्रे रेखाटणारी गूढगंभीर... 'हिरवे रावे', 'निळासावळा', 'सांजशकुन', 'पारवा', 'रक्तचंदन', 'पिंगळावेळ', 'काजळमाया', 'रमलखुणा' व 'पैलपाखरे' इत्यादी संग्रहातून जीएंनी जो कथाप्रपंच मांडला, तो मराठी कथाविश्वातील अनोखा आविष्कार होय. जीएंचे कथाविश्व हे भव्यतेचे आणि उदात्ततेचे कथाशिल्प आहे. जी.ए. म्हणजे मराठी कथाविश्वातले एक

देखणे शब्दशिल्प होते.

१९५५-५६मध्ये 'सत्यकथा' मासिकातून जी.ए. कुलकर्णी यांच्या 'पडदा', 'राणी', 'गुंतवळ', 'अवशेष', 'वहाणा', 'मुखवटा' अशा कथा प्रकाशित होऊ लागल्या आणि त्यांनी मराठी कथेच्या वाचकांचे लक्ष वेधून घेतले. जी.एं.च्या आरंभीच्या कथांमध्ये मानवी संबंधाविषयी, त्यातील अतूट नात्याचे सखोल दर्शन घडते. वाचकाला खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य त्या कथांत आहे. 'राधी', 'कांकणे', 'बाधा', 'वस्त्र', 'सोडवण', 'लक्ष्मी' अशा कित्येक कथा मनात कोरल्या जातात. नंतर मात्र त्यांच्या कथांनी एक वेगळे वळण घेतले. 'प्रवासी', 'विदुषक', 'ऑर्फियस', 'इस्किलार' या कथांमध्ये आयुष्याच्या अस्थिरतेचे, नियतीच्या निरनिराळ्या खेळाचे दर्शन घडते. त्या कथा पुन्हापुन्हा वाचाव्याशा वाटतात. कारण त्या कथांमधून मानवी जीवनाचे खरे स्वरूप जाणवते.

मधल्या दहा वर्षांच्या काळात जी.एं.ची लेखनशैली बदलत गेली. कथा या वाङ्मयप्रकाराकडे ते अधिक गांभीर्याने पाहू लागले आणि अत्यंत निष्ठेने पुढचे कथालेखन करायला ते प्रवृत्त झाले. 'पिंगळावेळ'पर्यंतच्या संग्रहातील कथांनी तर केवळ गाडगीळ-गोखले यांच्यानंतरचा हा महत्त्वाचा कथाकार आहे एवढेच ठरवले नाही, तर एकूणच मराठीतला हा श्रेष्ठ लेखक आहे आणि त्याने मराठी कथेलाच एका उंचीवर नेले असे नसून, समग्र मराठी साहित्यालाच महत्ता प्राप्त करून दिली.

नवकथेच्या बहरानंतर नवकथेने संस्कारित झालेली, पण स्वतंत्र प्रकृतीची अशी कथा जीएंनी लिहिली. त्यांच्या कथा बऱ्याचदा दीर्घ आहेत. पण त्या इतक्या सकस आहेत की त्यांत कादंबरीचा ऐवज दिसतो. त्यांच्या कथांना कादंबरीचा पल्ला होता आणि महाकाव्याची झेप होती. खरं म्हणजे जी.ए. कवीच व्हायचे. चुकून ते कथालेखक झाले. जीएंनी मराठी लघुकथांमध्ये स्वतःचे एक वेगळे विश्व निर्माण केले. त्यांच्या कथांतील पात्रे न कळणाऱ्या नशिबाच्या शोधात आहेत. एक गडद मोड अस्पष्ट मार्ग प्रतिबिंबित करतो, ज्यामध्ये नियतीने त्यांच्या पात्रांना सावली दिली आहे. प्रतीकात्मकता, रूपकात्मकता आणि विडंबनाचा त्यांचा वापर त्यांच्या कथांना एक अनोखा पोत आणि लोकभावना प्रदान करतो. पुढे जीएंची कथा अनेक दिशांनी विस्तारू लागली. कधी ती 'फँटसी'चे रूप घेऊन आली तर कधी तिने जनमानसात दृढमूल होऊन बसलेल्या लोककथांचा आश्रय घेऊन स्वतंत्र कथा लिहिल्या. कधी रूपकांतून जीवनाचे व्यामिश्र गुंतागुंतीचे आकार शोधले तर कधी भव्य शोकांतिकांचे रूप घेऊन त्यांची कथा प्रकट झाली.

जानेवारी १९५९मध्ये 'निळासावळा' हा जीएंचा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. जीएंचा हा पहिला कथासंग्रह प्रकाशित होण्याआधी त्यांच्या कथेने रसिकांचे

लक्ष वेधून घेतले होते. मानवी दुःखाची अटळता, त्यांच्या संभवाची अतर्क्यता आणि प्रतीकांनी थबथबलेली अभिव्यक्ती हे जी.ए. यांचे विशेष या कथांमध्येही आढळतात. जीएंच्या सर्वच कथांचे वैशिष्ट्य असे की त्यांची कथाही कादंबरीचे बळ घेऊनही, कथा राहणारीच लघुकथा आहे. तिचे स्वरूप कवितेच्या भाषेशी जुळण्यासारखे नाही. ती अगदी स्वाभाविकपणे प्रतिमांमधून बोलते. जी.ए. एक कथात्म अवकाश निर्माण करतात. त्यामुळेच वाचकांना जीएंची कथा कादंबरीचा आवाका असलेली वाटते. त्यातला निवेदक आस्वादाच्या आड येत नाही. कथात्म अवकाशाला स्वायत्तता देऊनही हा कथाकार अदृश्य रूपाने कथाभर वावरत असतो.

जीएंच्या कथाविश्वात असंख्य माणसे आहेत. स्त्री, पुरुष, लहान मुले, तरुण, वयस्क, सुरूप, कुरूप, म्हातारी, दरिद्री, मध्यमवर्गीय, घरंदाज आणि बेवारस अशा, या माणसांच्या कितीतरी तऱ्हा आहेत. तशाच त्यांच्या स्वभावाच्याही. या माणसांमध्ये उत्कट दुःख असते, तसेच उत्कट कौर्य असते. कमालीचा भाबडेपणा असतो आणि बेरकीपणाही असतो. जीएंच्या कथाविश्वात मत्सराने जळणारी, जहाल, एकमेकांचा द्वेष करणारी, एकमेकांशी अतिशय क्रूरतेने वागणारी माणसेदेखील आहेत. किंबहुना व्यक्तीव्यक्तीमधील पराकाष्ठेचा दुरावा हा व्यक्तीच्या एकाकीपणाचा दुसरा पैलूही तेवढ्याच सामर्थ्याने व्यक्त झालेला आहे. खरंतर जीएंच्या अनेक कथा या कुटुंबकथा आहेत. म्हणजे त्यात कौटुंबिक नातेसंबंधाने एकत्र येणारी माणसे आहेत. पण तीही खऱ्या अर्थाने जवळ येत नाहीत. या माणसांत गैरसमजुतीच्या भिंती उभ्या असतात. ती एकमेकांचा द्वेष करतात. एकमेकांशी अतिशय दुष्टपणाने वागतात. एकमेकांची नाती तोडतात. खरंतर जीवनात अनेक दुःखद प्रसंग प्रत्येकाच्या वाट्याला येत असतात. त्यामुळे माणसे दुःखी होतात. अशी दुःखी होणारी कितीतरी माणसे जीएंच्या कथांत वारंवार भेटतात. माणसाच्या जीवनातील व्यर्थपणा हा जीएंच्या कथाविश्वाचा एक अविभाज्य घटक आहे. त्यातून निर्माण होते ती नियतिशरणता. अतिशय विसंगत माणसे दैवाने एकत्र बांधली जातात. एकाला दुसऱ्याचे मन कळत नाही. एकाला दुसऱ्याची भाषा उमगत नाही. मग ती हताश होतात. जीवनाचे वैफल्य निमूटपणे बघत राहण्याखेरीज दुसरा उपाय उरत नाही. माणसांचे एकमेकांना समजून न घेणे आणि त्यामुळे त्यांनी परस्परांपासून दुरावणे, दुःखी होणे हा अनुभवाचा विशिष्ट आकार जीएंच्या कथांमधून वारंवार दिसून येतो. जीवनातील वाट्याला आलेली अर्थशून्यता, विसंगती, नियतिशरणता हेही त्यांच्या कथाविश्वात पुन्हापुन्हा येतात, जाणवतात.

जीएंची बहुतेक पात्रे आतल्या आत दुःखी असतात. मूकतेने ती दुःख सहन करण्याचा प्रयत्न करतात. मोडून जातात तेव्हाही ती आपली दुःखे आपल्याशीच

घेऊन. जी.ए. कुलकर्णी यांचे कथाविश्व माणसांनी भरलेले आहे. तसेच त्या पात्रांच्या नशिबी आलेल्या भोगाने ते गच्च भरलेले आहे. जीएंनी एके ठिकाणी स्वतः म्हटलंय, ''माझ्या पात्रांचं भळभळत्या रक्तासारखं दाट दुःख एका शब्दात कसं मांडावं? परिसीमेची निराशा, विषण्णताच माझ्या कथांतील पात्रांच्या मनातून ओसंडून वाहते आहे. माझ्या मनातील भावनेचा कल्लोळही आता शमून, त्याला खोली प्राप्त होते आहे.''

माणसाचे मूलभूत एकाकीपण, भरल्या जगात त्याला वाटणारी तुटलेपणाची जाणीव जीएंच्या कथांमधून वारंवार आढळून येते. तो सूर त्यांच्या त्या अगदी प्रारंभीच्या कथेतूनही छेडला गेला आहे. माणसाच्या वाट्याला येणारे हे अपार एकटेपण आपल्या अनेक कथांमधून जी.ए. तीव्रतेने अधोरेखित करतात. हे एकटेपण पुष्कळदा परस्परांना समजून घेण्याच्या असमर्थतेतून निर्माण झालेले असते. कधी दारिद्र्य, कधी एखादी शारीरिक व्यथा किंवा व्यंग, बुद्धीचा अभाव, कधी रूपहीनता, कधी क्षणिक मोहाच्या आहारी जाऊन हातून घडलेला गुन्हा, यांच्यामुळेही एखादी व्यक्ती भोवतालच्या जगापासून अलग होते. आणि मग ही माणसे आपले नशीब आपण भोगत, आपापल्या कोशात जगत राहतात. अशा माणसाच्या स्थितीच्या कथा जीएंनी लिहिल्या आणि त्या अर्थगर्भ ठरल्या. वाचकांना अस्वस्थ करत राहिल्या. या सूत्रात गुंफलेल्या जीएंच्या कथांनी मराठी साहित्यात एक वेगळे दालन निर्माण केले. जगातील सारी वैभवे हस्तगत करूनही ती मिळाल्याने समाधान लाभत नाही. कसली तरी कीड त्या वैभवाला प्राप्त झाल्यामुळेही सुखापासून वंचित व्हावे लागते. अशा माणसाच्या स्थितीच्या कथा जीएंनी लिहिल्या आणि त्या अर्थगर्भ ठरल्या. वाचकांना अस्वस्थ करत राहिल्या. जगाची बंधने तोडून माणूस पुढे जायला पाहतो. त्यात घायाळ होतो. नाणी खोटी असतात, नकली असतात, याचा प्रत्यय आल्याने असाहाय्य होतो. आपण एकटेच आहोत या जाणिवेने निराश होतो आणि तरीही नव्या उमेदीने पुन्हा उभा राहतो.

माणूस जीवनात इतका दुःखी, इतका असाहाय्य का असतो? त्याच्या वाट्याला इतके वैफल्य का येते? याला उत्तर नाही. कोणतीही राजकीय वा सामाजिक आदर्श व्यवस्था, कोणताही धर्मग्रंथ, कोणतेही तत्त्वज्ञान या दुःखावर इलाज करू शकत नाही. माणसाच्या जीवनात दुःखे येतात, जीवनावर आघात करतात. यातना भोगाव्या लागतात, वियोग घडतो आणि माणसे हे सारे सोसतात, स्वीकारतात व पचवतात. माणसे जीवनात हताश होतात, पिचून जातात. अशी हताश झालेली, जीवनाला शरण गेलेली, हतबल झालेली माणसे जीएंच्या कथांमधून दिसून येतात हा या नियतिशरणतेचा एक अटळ परिपाक असतो. जीएंची सारी पात्रे अशी

नियतीला निमूट शरण जाणारी असतात.

या दुःखी नियतिशरण माणसांबद्दल जीएंना अपार कणव वाटते. पण या कणवेला एक दुसरी बाजू असते. त्यातून जीएंचा कडवट विनोद निर्माण झाला आहे. जगात खोटेपणा, मूर्खपणा, भंपकपणा भरपूर आहे. तो बघताना जी.ए. प्रथम व्यथित होतात आणि मग कडवट बनतात. व्यभिचार, खून, शरीरयातना, आत्मपिडा, परपीडा यांची उग्र क्रूर चित्रे जीएंच्या कथांत सर्वत्र विखुरलेली दिसतात. पण त्यामागेही माणूस या जातीवरचे त्यांचे अथांग प्रेम आहे. या प्रेमाची, कणवेची दुसरी बाजू कौर्याच्या, जहरी विनोदाच्या रूपाने व्यक्त होते. जीएंनी निर्माण केलेल्या व्यक्तींचे दुःख, त्यांचे अपयश हे वेगवेगळे आहे आणि ते त्यांनी समर्थपणे रंगविलेले आहे. स्वतः जीएंना वेदनेचा वेध घेण्यासाठीच ओढ लागली होती. ही वेदना वरवरच्या सुखी जीवनात असते आणि दुःखी, पराभूत जीवनातही असते. वेदनेची नस शोधण्याचा, त्या नसेजवळ जाण्याचा प्रयत्न जीएंनी त्यांच्या कथांमधून सतत केला. हा वेदनेच्या नसेजवळ जाण्याचा प्रयत्न जीएंनी निष्ठापूर्वक व सातत्याने केला. पण हे करताना उबलेला रडकेपणा आणला नाही... आणि आपल्या या अनुभवविश्वाशी व वृत्तीशी जी.ए. प्रामाणिक राहिले; त्यांनी स्वतःच्या मनाला एक शिस्त लावून घेतली होती आणि ते आपल्याच विश्वात रंगून गेले होते.

माणसाचे जीवन मुळातच निवांत आहे. आपण त्याची संगती लावण्याचा, त्यात काही सूत्र शोधण्याचा प्रयत्न करतो; पण तशी संगती, तसे काही सूत्र नसतेच. जीवनाचा अर्थ लावायचाच असेल तर तो 'अर्थहीनता' एवढाच आहे, हे सत्य जीएंच्या अनेक कथांमधून मनावर चरचरून डाग दिल्यासारखे उमटते. जीएंच्या कथांत जीवनात भोगाव्या लागणाऱ्या यातना असह्य होऊन एखाद्यानं तीव्र दुःखाचे चित्कार काढत राहावं अशा त्यांच्या सर्व कथा आहेत.

जीएंची अनुभव घेण्याची पद्धत वेगळी होती. उघड्या-नागड्या अनुभवाला भिडण्याची पद्धत निराळी होती. एका निराळ्या कल्पनासृष्टीत त्यांनी वाचकांना खेचून नेले; पण उच्च पातळीवर नेऊन एक मानदंड प्राप्त करून दिला. वैयक्तिक खेळात एखाद्या विक्रमवीराने आपलेच विक्रम पुन्हापुन्हा मोडत जावेत तसे जी.ए. कुलकर्णी आपल्या शब्दकळेने वाचकांना निरंतर थक्क करत जातात. जीएंच्या कथा वाचणं हा एक विस्मरणीय अनुभव असतो. अशी किमया फक्त जी.एं. सारखे अजोड प्रतिभावंतच करू शकतात. त्यांच्या लेखनाचा ध्यास हा मानवी जीवनाच्या गाभ्याकडे जाण्याचा एक अथक असा प्रयत्न होता. जीएंनी आपल्या कथांतून मानवी दुःखाचा, यातनांचाच शोध घेतला आहे, हे दिसून येते. वाचकाला गुंतवून ठेवणारीच नव्हे तर झपाटून टाकणारी कथा ते लिहू शकले, ते यामुळेच.

मानवी अस्तित्वाचा व मानवी जीवनाचा अर्थ शोधण्याची धडपड त्यांच्या कथांतून दिसते. माणसामाणसांमधील परस्परसंबंध, त्यांचे भावनिक विश्व, माणसाची अगतिकता आणि परिस्थितीमुळे येणारे असाहाय्यपण हेच त्यांच्या कथेचे अनुभवविश्व बनून गेले होते.

जी.ए. यांचे कथाविश्व असे अफाट वैविध्यपूर्ण, उग्र, भयावह, हळुवार, कोमल, रांगडे आणि विलक्षण शोकात्म आहे. या विश्वाला साकार करणारी त्यांची भाषा तपश्चर्येने कमावलेली आणि आत्मविश्वस्त ताकदीने वापरलेली आहे. जीएंचे लेखन त्यांनी केलेल्या निरीक्षणांवर आधारित होते, आणि मानवी भावना, दुःख आणि यातना यांचा त्यांनी अभ्यास केला होता. मानवी जीवनाच्या अंतिम एकाकीपणाचा आणि त्यांच्या असीम दुःखमर्यादेचा बोध हे जीएंच्या कथालेखनाचे मुख्य ईप्सित होते. त्यांचा हा प्रयत्न केवळ मराठी साहित्यातच अपूर्व आहे असे नव्हे तर साऱ्या भारतीय ललित वाङ्मयातही तो दुर्मीळ आहे. थोडक्यात, हातात पारा पकडावा तसा अनुभव जीएंच्या कथाकथनाच्या (कथावाचनाच्या) टोकाशी राहतो. काहीतरी गवसल्यासारखे वाटते; पण तेवढ्यातच काहीतरी हरवल्यासारखेही वाटते. कथेचा आशय सुळ्ळकन निसटून जातो. जीएंच्या कथा समजून घेण्याचा हा प्रवास असाच गवसल्या-हरवल्यासरखा वाटतो. माणसाच्या अर्थहीनतेपायी जीवनातले काहीतरी फारच सुंदर, उदात्त, मोलाचे असे जीएंच्या कथांतून सतत सांडून वाया जात असते. नष्ट होत असते. मग सगळ्या आयुष्यालाच एक रखरखीत उजाडपणा, वांझोटेपणा येत असतो. जे अनिष्ट, असुंदर, दुःखमय, काटेरी, ते फोफावत राहते आणि जे पवित्र, सुंदर, मंगल, आनंदमय, ते व्यर्थ जावे ही जीवनातली एक अपरिहार्य सत्य व कठोर वस्तुस्थिती आहे. ही अर्थहीनता जीएंच्या अनेक कथांमधून अनुभवण्यास मिळते. थोडक्यात, जीवनाच्या अर्थशून्यतेची जाणीव जी.ए. जन्मभर आपल्या लेखनातून शोधत राहिले. तो शोध त्यांच्या अखेरीपर्यंत चालू होता.

जीएंच्या लघुकथांमध्ये मानवी परिस्थितीच्या दुःखद आणि क्रूर पैलूंचे चित्रण आहे. मानवी व्यथेचा मूक आवाज ही जीएंची मूळकथा आहे. जीएंच्या कथांत जीवनात भोगाव्या लागणाऱ्या यातना असाहाय्य होऊन एखाद्यानं तीव्र दुःखाचे विकार काढत राहावं अशा त्यांच्या सर्व कथा आहेत. माणसाच्या सर्व श्रद्धा झिंझोडून टाकण्याचे सामर्थ्य त्यांच्या कथांमध्ये आहे. जीएंच्या कथांचा नुसता धांडोळा घेतला (गुंतवळ, ऑर्फियस, स्वामी, इस्किलार, प्रवासी, माणूस नावाचे बेट इ.) तरी जीवनावर भाष्य करण्याची किती ऊर्मी त्यांच्यात दाटून राहिली होती, याची प्रचिती येते. सर्व सुखी कुटुंबाचं सुख सारख्याच प्रकारचं असलं तरी प्रत्येक

दुःखी कुटुंबांचं दुःख हे वेगवेगळं असतं हे सत्यच जीएंच्या कथा व्यक्त करतात. जीएंच्या लेखनाचा विकास जर पाहिला, तर त्यात ही आत्मखूण दिसते. प्रारंभीचे त्यांचे लेखन माणूस आणि त्याच्या भोवतीचा मानवी–अमानवी जडचेतन पसारा यांच्या मागील सूत्र शोधण्याच्या जाणिवेतून झालेले दिसते.

जीएंच्या कथेत वाचकाला कविता, कादंबरी, नाटक अथवा पटकथा या सगळ्या वाङ्मयप्रकारांची वैशिष्ट्ये आढळतात आणि वाचक जीएंनी वापरलेल्या कथा या वाङ्मयप्रकाराच्या शतरूपांनी अगदी चकित होऊन जातो. वाङ्मय, नाट्य, चित्रकला, स्थापत्य, चित्रपट अशा विविध आविष्कार माध्यमांची आठवण यावी अशा प्रकारे जीएंनी हा आकृतिबंध वापरलेला आहे. जी.ए. कुलकर्णी यांच्या कथा वाचत असताना कादंबरीतील अनुभवांची जटिलता व विस्तारही अनुभवता येतो आणि तरीही जी.ए. यांची कथा ही कथाच असते. आपले रूप न टाकता व वाचकाला न फसवताच ती इतर वाङ्मयप्रकारांचे बळ आत्मसात करते. जी.ए. यांच्या कथा एखाद्या शिल्पासारख्या आहेत. जी.ए. यांच्या कथेमध्ये अमुक एक आशयकेंद्र, तमुक विषय, अमुक तपशील, तमुक वातावरण असा काही प्रकारच नाही. शब्दांतून तपशील, तपशिलातून प्रतिमा, प्रतिमेतून आशय अशी घडण होत जाते. आणि तरी प्रत्येक घटक आपला मूळ स्वभाव कायम ठेवून असतो.

थोडक्यात, जीवनाच्या अर्थशून्यतेची जाणीव असूनही जी.ए. जन्मभर आपल्या लेखनातून जीवनाचाच अर्थ शोधत राहिले. तो शोध त्यांच्या अखेरीपर्यंत चालू होता. कोणत्याही चौकटीत बसवता न येणारी आणि कुठल्याही लेबलाचा मुलाहिजा न ठेवणारी जीएंची कथा भल्याभल्यांना चक्रावून गेली आहे. डोळे दिपून जावे अशी प्रतिभा असलेला हा एकमेव मराठी लेखक 'माणूस म्हणून' सर्वांनाच आव्हान देत राहिला. आपल्या निर्मितीत मग्न राहिलेले, बाह्य व्यवधानांनी अजिबात न ढळणारे व नियतीचे आव्हान पेलणारे असे ते लेखक होते.

जी.ए. एका पत्रात आपल्या कथांविषयी म्हणतात, ''माणसाचे जीवन खऱ्या अर्थाने माझ्या कथांचा विषय आहे. साऱ्या भोगवट्यातूनही माणूस ज्या जिद्दीने व ईर्ष्येने जगतो, भंगलेला कुंभ पुन्हा सांधून त्यात पाणी भरण्याचा प्रयत्न करतो, प्रेम निष्फळ होऊ शकेल हे माहीत असूनही इतरांवर प्रेम करतो, आयुष्याचे उग्र स्वरूप पाहूनही जगण्याची इच्छा व ईर्षा धरतो ती मानवी प्रेरणा मला फार जिवंत व अभिमानाची वाटते. दुःखाच्या विविध व उत्कट दर्शनात हा जगण्याचा अहंभाव शोधणे हा माझा प्रयत्न आहे. शुद्ध स्वरूपाच्या विचारांना शास्त्रात कितीही महत्त्व असले, तरी मला ते जिवंत वाटत नाहीत. माणसाच्या सुखदुःखातून ते जाणवले

पाहिजेत. जर त्यांना स्वतःची ऊब नसेल, मांसाचे आवरण नसेल तर ते केवळ बुद्धीचाच खेळ ठरतील. माणूस प्रथम जगतो व जगण्यामुळे हे प्रश्न निर्माण होतात.''

ही जीएंची भूमिका जरी मान्य केली, तरी सामान्य वाचकाला जीएंच्या कथा वाचल्यानंतर जाणवते ते हेच की जीवनाच्या गाभ्यापर्यंत पोचण्यासाठी चाललेली त्या योग्याची ही गूढमार्गावरील शोधयात्राच होती. याचसाठी त्या तपस्व्याने आजन्म घेतलेले हे असिधाराव्रत होते. आणि जीवनाबद्दल कसलीही आसक्ती नसलेला, परात्मभावाने बघणारा हा माणूस दुःखाची, वेदनेची एकतारी वाजवणारा, गूढ मार्गावर कालस्वराचा ध्यास घेणारा 'गूढयात्री'च होता!!

जीएंची थोरवी निर्विवादपणे आणि निःसंशयपणे मान्य करावी लागेल, ती त्यांच्या अभिव्यक्तीच्या अस्सल काव्यात्म प्रकाशमय गाभ्याबद्दल. '*अमृतातेही पैजा जिंके*' या सुप्रसिद्ध उक्तीतून प्रकट होणाऱ्या, आत्मविश्वासाने ओसंडणाऱ्या आश्वासनाला खरे करून दाखवणारी मराठी कथा जीएंनी लिहिली. त्यांच्या मराठीचा पोत खानदानी, गर्भरेशमी आणि नजर ठरू नये असा झळझळीत आहे, यात शंका नाही. धारदार दुःखाची विपरीत आणि खडतर चित्रं रंगवताना जीएंच्या वृत्तीला ज्या कोवळेपणाचा परिस्पर्श होतो, तो आश्चर्यकारक आहे. जीएंची लेखनशैली ही तालेवार, जुन्या घरंदाज बारीक कलाकुसर केलेल्या महावस्त्रासारखी. जसजसं हुंगत जावं, तसतसं अति सूक्ष्म गंधाचे पदर उलगडत जाणारी!

**– डॉ. बिभीषण सातपुते**

भ्रमणध्वनी : ७९७२८२१८०७/९४२३०५८०३५

## अभिनंदन


### 'अनाकलनीय' या कथासंग्रहासाठी पुरस्कार

- **'साहित्य दर्शन राज्यस्तरीय पुरस्कार', कळमनुरी, नांदेड**
- **'कै. विठ्ठलराव केदार पुरस्कार', उदगीर**
- **'अक्षरबंध राज्यस्तरीय पुरस्कार', नाशिक**
- **'आशीर्वाद पुरस्कार', मुंबई**

या ४ साहित्य पुरस्कारांसाठी
प्रा. प्रतिभा सराफ यांचे अभिनंदन!

# यास्मिन शेख : मराठी भाषेवरील प्रेमाचा अखंड वाहता झरा

**दिलीप फलटणकर**



**यास्मिन शेख**

माणूस स्वतःचे अनुभव आणि आठवणींचे संचित घेऊन जगत असतो. त्या आठवणी सतत मनात रुंजी घालत असतात. माझ्या आयुष्याकडे मी मागे वळून पाहिल्यानंतर काही-काही गोष्टींचं राहून राहून मला आश्चर्य वाटतं, वि.स. खांडेकर, स. शि. भावे, दत्तप्रसाद दाभोळकर, विठ्ठल वाघ, मृदुला जोशी, यास्मिन शेख, भानू काळे या सर्वांची साहित्य क्षेत्रातील ज्येष्ठता आणि त्यांनी आपले जीवन जगत असताना जपलेली मूल्यं पाहिली की, माझाच मला हेवा वाटतो. ही सदैव लिहित्या हाताची लेखक माणसं, आभाळाएवढी मोठी. या सर्वांचे निरपेक्ष प्रेम मला मिळालं. त्यांच्याबद्दलची कृतज्ञता कोणत्या शब्दांत व्यक्त करायची, हे मला कळत नाही. या सर्वांचा सहवास आणि मार्गदर्शन हा माझ्या आयुष्यातील अनमोल ठेवा आहे.

'अंतर्नाद' मासिकाच्या रूपाने मराठी नियतकालिकांना एक वैभवशाली परंपरा देणारे ज्येष्ठ लेखक आणि साक्षेपी संपादक भानू काळे यांना दिव्य प्रतिभेची जन्मजात देणगी मिळाली आहे. त्यांनी एकाहून एक सरस पुस्तके मराठी साहित्याला दिली आहेत. त्यांचा 'अंतर्नाद'चा पहिला अंक ऑगस्ट १९९५मध्ये प्रसिद्ध झाला. मी या पहिल्या अंकाचा साक्षीदार आहे. इतर पुस्तकांत 'मुद्रितशोधक' असा उल्लेख असतो; पण 'अंतर्नाद'ने प्रथमच 'व्याकरण सल्लागार' असा उल्लेख करून यास्मिन शेख यांचा सन्मान केला आहे. प्रा. यास्मिन शेख यांची 'मराठी लेखन मार्गदर्शिका'

आणि ‘मराठी शब्द लेखनकोश’ ही दोन्ही पुस्तकं माझ्या संग्रही आहेत. त्या औंधच्या ‘विसावा पार्क’मध्ये राहतात, हे मला माहीत होतं. त्यांना एकदा भेटावं, असं मला खूप वेळा वाटत होतं. या विसावा पार्कमध्ये एकदा-दोनदा गेलोही; पण त्यांचे मराठी भाषेच्या व्याकरण क्षेत्रातील कार्य आणि त्यांच्या विद्वत्तेची माझ्या मनात उगाचच भीती वाटत होती.

नंतर काही वर्षांनी माझे मित्र आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष शमसुद्दीन तांबोळी यांच्यामुळे त्यांच्या मोठ्या मुलीच्या बाणेरच्या घरी माझा प्रवेश झाला आणि मी त्या घरातलाच एक कधी झालो, हे मला कळलेच नाही. डॉ. शमाताई आणि रुमाताई यांचा मी दिलीपभाऊ झालो. त्या दोघींच्या रूपाने मला दोन बहिणी मिळाल्या. पटापट दिवे लागावेत, तशा सुखद गोष्टी माझ्या आयुष्यात घडत गेल्या. प्रा. यास्मिन शेख यांनी मराठी भाषाविज्ञान आणि व्याकरण क्षेत्राची आयुष्यभर केलेली सेवा, ही मराठी साहित्यविश्वाला दिलेली फार मोठी देणगी आहे. यास्मिन शेख यांची गुरुवर्य श्री. म. माटे यांच्यावर गाढ श्रद्धा. त्यांनीही त्यांचा विश्वास सार्थ केला. यास्मिन शेख यांच्या कार्याचे सार एका वाक्यात सांगायचे म्हणजे शंभरातील साठ वर्षं त्यांनी मराठी भाषेच्या व्याकरणावर आणि भाषाशास्त्रावर प्रेम केले.

सरोजिनी वैद्य या राज्य मराठी विकास संस्थेच्या अध्यक्ष झाल्या, त्यांनी यास्मिन शेख यांना मराठी प्रमाणभाषेचे १८ नियम सामान्य माणसाला कळतील असे पुस्तक लिहिण्यास सांगितले. त्यांनी ‘मराठी लेखन मार्गदर्शिका’ हे पुस्तक लिहिले. त्याला सामान्य वाचकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. त्याच्या तीन आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. नुकत्याच वाशी येथे झालेल्या जागतिक मराठी साहित्य संमेलनात उपस्थित असणाऱ्या सर्वांना महाराष्ट्र शासनाने हे पुस्तक मोफत वाटले. त्यांचा ‘मराठी शब्द लेखनकोश’ सर्व शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, अनेक वृत्तपत्रांच्या संपादकांच्या टेबलावर मी पाहिला आहे. ‘सर्वसामान्य मराठी माणसाला मराठी शब्दांचे बिनचूक लेखन करता यायला हवे’ या दृष्टीने प्रस्तुत कोशाची मांडणी केली आहे. कोणत्याही भाषेचा शब्दकोश हा त्या भाषेतील एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ असतो. आज प्राथमिक शाळांतून, माध्यमिक-उच्चमाध्यमिक शाळांतून -विशेषत: ग्रामीण भागांतील शाळांतून- मराठी लेखनाबद्दल अनास्था दिवसेंदिवस वाढत आहे. मराठी साहित्य महामंडळाने निश्चित केलेल्या लेखनविषयक नियमांनुसार मराठी शब्दांचे लेखन होणे अत्यंत आवश्यक आहे. हे नियम महाराष्ट्र शासनाने मान्य केलेले आहेत.

मराठी साहित्य महामंडळाचे लेखनविषयक नियम नीटसे माहीत नसल्यामुळे

लेखनात वारंवार चुका होतात. यासाठी 'लोकसत्ता' या दैनिकाने २०२२ साली 'भाषासूत्र' हे सदर प्रकाशित करून मोलाचे काम केले आहे. या सदरात यास्मिन शेख, डॉ. माधवी वैद्य, डॉ. नीलिमा गुंडी, डॉ. निधी पटवर्धन, वैशाली पेंडसे-कार्लेकर आणि भानू काळे यांनी अभ्यासपूर्ण लेखन केले आहे. या 'भाषासूत्र'मधील लेखांचे एक पुस्तक होणे आवश्यक आहे. मी हे सर्व लेख माझ्याकडे जपून ठेवले आहेत. 'लोकसत्ता'मध्ये लेख प्रकाशित झाला की, लगेच फेसबुक किंवा व्हॉट्सअपवर मोठी चर्चा होत असे, कमीत कमी शब्दांत महत्त्वाचे नियम उदाहरणासह समजून सांगितल्यामुळे त्यातून सर्वसामान्य वाचकांचेही मोठे प्रबोधन झाले. या सदरात प्रा. यास्मिन शेख यांचे बावन्न लेख प्रकाशित झाले. १ ऑगस्टच्या लेखाचे नाव होते 'गाणे सुरात गावे, तसे भाषासौंदर्य व्याकरणात जपावे.' प्रा. यास्मिन शेख म्हणजे व्याकरणातील एक ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व; पण त्यांना कणभरही गर्व कधी शिवला नाही. त्यांनी विद्वतेचा टेंभा मिरवला नाही. उलट नम्र शब्दांत त्या लिहितात, 'मी मराठी आहे. मराठी भाषेवर माझे प्रेम आहे. त्या भाषेची सेवा करण्याचे भाग्य मला मिळाले.'

आता यास्मिन शेख या शंभरीत प्रवेश करीत आहेत. या वयातही ज्ञानलालसा आणि विद्याभिलाषा तशीच आहे. आजही अनेक लेखकांच्या पुस्तकाचे मुद्रितशोधन करणे, पुस्तकांना प्रस्तावना लिहिणे असे काम दिवसभर चालू असते. यास्मिन शेख यांना सात्त्विक आणि देखण्या चेहऱ्याचा नजराणा मिळाला आहे, लालसर गोरा रंग, चेहऱ्यावर बुद्धिमत्तेचे तेज, वात्सल्याने भारलेले पारदर्शक डोळे, चेहर्यावर गोड स्मित, लालसर ओठ. या शंभरीतही त्या सुंदर दिसतात. त्यांचा सहवास म्हणजे बौद्धिक आनंदाचा आणि चैतन्याचा झरा असतो.

'बन्सीधरा ! तू आता कुठे रे जाशील ?' व 'उपेक्षितांचे अंतरंग' लिहिणारे माटे यांचे मानवतेचे व्रत, संवेदनशीलतेचा, सर्वधर्मसमभावाचा वसा यास्मिन शेख यांनी पुढे चालवला आहे. यास्मिन शेख सर परशुराम विद्यालयात शिकत असताना बी. ए.ला केवळ मराठीतच नव्हे, तर सर्व विषयांत सर्वप्रथम आल्या, तेव्हा माटे मास्तर म्हणाले होते, 'मला मोठा मुलगा असता, तर जेरुशा, मी तुला माझी सून करून घेतली असती.' यास्मिन शेख कुठलंही काम असो, त्या मनापासून करतात. एखाद्या शब्दाबद्दल शंका आली की, हाताशी असणारे चार-पाच शब्दकोश मला त्यांच्या टेबलावरून आणायला सांगणार, खात्री झाल्याशिवाय पुढे वाचणारही नाहीत. देशपरदेशांतून लोक फोनवर मराठी व्याकरणाबाबत चर्चा करत असतात. घरी येणारे नातेवाईक, स्नेही, व्याकरणक्षेत्रातील अभ्यासक या सर्वांशी त्यांचे स्नेहाचे आणि सलोख्याचे संबंध आहेत. त्यांची मुलगी डॉ. शमा यांना झाडाफुलांची आवड आहे. नेहमी फुलांची, झाडांची देखभाल करीत असतात. त्यांच्या बागेतील

देखण्या फुलांनी आणि सुगंधानी घर सजलेलं असतं.

बाणेरमधील त्यांच्या मुलीचा रिव्हिरेसा सोसायटीतला फ्लॅट मोठा आणि सुंदर आहे. आज यास्मिन शेख आनंदी आणि तृप्त जीवन जगत आहेत, याचे सर्व श्रेय त्यांच्या दोन्ही मुलींना द्यावे लागेल. डॉ. शमाताई आणि प्रा. रुमाताई त्यांची मनापासून काळजी घेतात. यास्मिन शेख यांची वयाच्या शंभरीतील जबरदस्त इच्छाशक्ती म्हणजे चमत्कार आहे. रोज न चुकता एक तासभर व्यायाम करतात. आता वरचेवर दुपारी त्यांच्या घरी जाणे हा माझ्या आयुष्यातला एक आनंदाचा भाग झाला आहे. कधी एखादे पुस्तक वाचून दाखवणे, गप्पा मारणे यात वेळ कधी जातो समजत नाही. मराठी भाषेच्या समृद्धीसाठी सहा दशके काम करणाऱ्या यास्मिन शेख यांची मराठी साहित्य क्षेत्राने अधिक चांगली दखल घ्यायला हवी होती, असं मला वाटतं. सहा दशकांची त्यांची तपश्चर्या चिरंतन ठेवण्यासाठी मराठी साहित्यातील एक जाणकार व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. माधवी वैद्य यांनी मला त्यांची दोन तासांची सविस्तर मुलाखत घ्यायला लावली. ती फेसबुकवर उपलब्ध आहे. मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाने एक चांगला प्रयत्न केला. त्यांच्या प्रकाशित साहित्यापेक्षा अनेक लेख, मुलाखती, परिसंवादात व्यक्त केलेले विचार अप्रकाशित आहेत. यापुढे मराठी भाषेचा स्तर, एवढेच नव्हे तर, मराठी संस्कृतीची गुणवत्ता मराठी वृत्तपत्रांवर, प्रसारमाध्यमांवर अवलंबून राहणार आहे. मराठी भाषातज्ज्ञांनी हा विषय यथायोग्य परिप्रेक्ष्यातून पुढे न्यावा, एवढंच मला अतिशय नम्रपणे सांगावंसं वाटतं.

यास्मिन शेख म्हणतात, 'मराठी माझी मातृभाषा आहे. माझ्या मातृभाषेवर माझे नितांत प्रेम आहे. तिचे पावित्र्य जपणं, संवर्धन करणं हे माझं कर्तव्य आहे. गेली अनेक वर्षं मी तिची मनापासून आणि आनंदाने सेवा केली.'

यास्मिन शेख यांच्या नव्वदीच्या कार्यक्रमात डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर म्हणाले होते की, ''शेखबाईंकडे बघितल्यावर असे वाटते की, 'नाइंटी तो झाकी है । सेन्चुरी अभी बाकी है।''

आजही त्यांचा जगण्याचा उत्साह बघितला की, त्या नव्याण्णव पूर्ण करून शंभरीत प्रवेश करीत आहेत, हे खरे वाटत नाही. त्यांना असेच दीर्घायुष्य लाभो. त्यांच्याकडे असलेली अनेक पुस्तके मला त्यांनी भेट दिली आहेत. हे माझ्यासाठी अनमोल धन आहे. या त्यांच्या मातृतुल्य वात्सल्याचे चार थेंब माझ्या अंगावर पडतात, ही देवाची कृपा म्हणायची, दुसरं काय!

**– दिलीप फलटणकर**

भ्रमणध्वनी : ९८८१४१९७९६

# ।। कविता ।।

## चला लिहू!

चला लिहू काही वेगळं,
विचारांना देऊ शब्दांचं रूप.
मनातल्या प्रश्नांना–
कवितेच्या ओळींमधून देउया नवे काही खूप.

फक्त भावनेचं साहित्य नाही,
तर वैचारिकतेचंही तेज ल्यालेलं लेखन करू.
चला लिहू अन्यायाविरुद्ध,
शब्दांचे शस्त्र हाती धरू.

साहित्य म्हणजे असे समाजाचा आरसा,
हल्ली तो संवेदनशीलतेने पाहिला जात नाही फारसा.
त्यात दिसतात चढ–उतार जीवनाचे,
असतात आम्हा खोल प्रश्न हाताळायचे.

चला लिहू निसर्गातील,
माणसांच्या संवेदनशीलतेवर अन् माणुसकीवर.
भूतकाळात रमणं नको, भविष्य घडवायचं आहे,
म्हणून विचारांना दिशा देणारं लेखन फुलवायचं आहे.

चला लिहू निसर्गावर, नाही फक्त सौंदर्यावर,
चर्चाही करू नाशाकडे झुकणाऱ्या वृत्तींवर.
तंत्रज्ञानावरही लिहू – प्रगतीसोबत जबाबदारी,
यंत्राच्यामध्येही मानवी मन जपायची खरी तयारी.

लिहू स्वप्नांवर, पण कृतीची जोड देत,
लिहू क्रांतीवर, पण संवेदनशीलतेचं बीज रोवत.
लिहू भावनेवर, देत प्राधान्य विचाराला.
करू द्या विचार, चिखलातून उगवणाऱ्या कमळाला.

**– डॉ. अरुण सांगोलकर**
भ्रमणध्वनी : ९९२३७३४६५५

## बाप

बाप कष्टाचाच धनी,
राबायचा दिनरात
सुख आणाया घरात
गेली हयात शेतात ।।

दर साल सुगीलाच,
असं घडायचं काही
कधी रुसायचा मेघ
आणि धरा वांझ होई ।।

हाती कशाचा छदाम,
नित्य उधार उसनं
पिठा–मिठाला महाग,
तरी जपलं हसणं ।।

मुलाबाळां पोटभर,
देता कष्टाची भाकर
रित्या पोटानेच येई,
त्याला तृप्तीचा ढेकर ।।

हात मातीत राबले,
सुख कधी ना घावले
चितेवरचे जळणे,
जितेपणीच भोगले ।।

गत उभा नित्य आधाराला,
लळा माणसांचा त्याला
गाव–भावकीत बाप,
नाही कोणाला सलला ।।

धरा पिकता अमाप,
दान देता बलुत्याला
बळीराजाहून मोठा,
बाप वाटायचा मला ।।

**– सचिन बेंडभर**
भ्रमणध्वनी : ९८२२९९९३०६

## पाऊस

फक्त पडतानाच तेवढा, एकटा असतो पाऊस
अगदी पाण्यासारखाच निर्लेप असतो पाऊस

पानाफुलांवर पडून निसर्गसौन्दर्य वाढवतो पाऊस
डोक्यावर आभाळ नसलेल्यांचे अश्रू दडवतो पाऊस

राधेचा जिवलग मेघसखा होऊन बरसतो पाऊस
लहानग्याचा हर्ष होऊन नाचतच येतो पाऊस

नद्या, नाले तलाव होऊन भरभरून वाहतो पाऊस
हिरवाई होऊन बळीराजाला समृद्ध करतो पाऊस

मानवाच्या अक्षम्य चुकांमुळे कमीजास्त पडतो पाऊस
तरीही तुमच्या–आमच्या शिव्याही खातो पाऊस

तरीही नित्य नेमाने ज्याला जे जे हवं
ते ते द्यायचा प्रयत्न करतो पाऊस

**– ज्योती कपिले**
भ्रमणध्वनी : ९७६९१४१०७४

## हुंकार...!

चुलीच्या धुराने
धुरकट झालेली
तुझी नजर

विहिरीचे खोल पाणी
शेंदून काढताना
जाऊ पाहणारा
तुझा तोल

जात्यावर दळताना
पाठीला लागलेली
असह्य कळ

सगळं सगळं
एका क्षणात संपवलं
तुझ्या शिक्षण नावाच्या
गगनभरारीने
तू शिकली
आणि
वाटा
तुझ्या स्वागताला
उभ्या राहिल्या
भौतिक सोयी सोड
शिळा होऊन पडलेली
तू
आता कुण्या पुरुषाच्या
स्पर्शप्रतीक्षेत अडकून
न राहता मुक्त झालीस
तो स्पर्श होता
तुझ्या अंतरात उमटलेल्या
स्व-जाणिवेच्या हुंकाराचा..
बयो...
हा हुंकार
ठिणगी न राहता
वणवा होऊन जळू दे
साऱ्या वाईट नजरा
आणि
स्वच्छ होऊ दे
मनीमनीचा आसमंत सारा...!

**– उमेश घेवरीकर**
भ्रमणध्वनी : ९८२२९६९७२३

## ओंजळ

दिवेलागणीच्या
शीतल प्रकाशात
तेवणाऱ्या नंदादीपासमोर
नकळत उभी राहते
तुझी निरागस मूर्ती
आकाशाच्या विलोभनीय अवकाशाला
तेजोमय स्वरांनी
क्षराक्षरांचा अर्थ देत
आणि मी शोधत असतो
त्या निरामय डोळ्यांत
अनंतजन्मीचे संदर्भ
*'सावळाच रंग तुझा*
*केतकीच्या बनापरी...'* म्हणत
या ओळींमधल्या सौंदर्याचे अर्थ
मला पुरवून जातात, विश्वात्मक
सौंदर्याचे युगानुगांचे संदर्भ
कधी खजुराहोच्या शिल्पात
कधी वेरूळच्या कैलासलेण्यात
कधी अजिंठ्याच्या सप्तरंगात
तर कधी बासरीच्या
कोमल स्वरातून
कित्येकदा न्याहाळले आहे मी तुला
सा रे ग म प ध नि सा...म्हणत

आता अवकाशाचे
सारेच बंध लुप्त झालेत
आणि तेजोमय नंदादीपाच्या
वलयांकित प्रकाशात
माझ्याही अस्तित्वाला
आकार प्राप्त झाला
तुझ्या अस्तित्वाचे
सारे संदर्भ पेरुन
आणि नकळत जोडले गेलेत हात
शुभंकरोती म्हणत...
तू दिलेली फुले अजूनही
तशीच टवटवीत आहेत
माझ्या ओंजळीत...

**– अविनाश आवलगावकर**
भ्रमणध्वनी : ९८५०११८५८०

## आत्मक्लेश

कबुली द्यावी
इतकं तगडं प्राक्तन
कुठे आहे आपल्याजवळ...!

सहज सुंदर खोटं
बोलूनच सजवित गेलो
इमल्यावर इमले...

निष्कर्ष शंभर टक्के
खरा ठरावा
इतके अंदाज बांधले
तरी ओळखू येत नाही
इथली लबाडी...

उगवणशक्ती नष्ट होऊन
पतंगाचे दोर कापले गेलेत
अदृश्य कप्प्यातून
प्रतिमा शोधायचा
प्रयत्न केला तर
फक्त आणि फक्त
आत्मक्लेषाची राक्षसी
प्रतिमा समोर उभी राहते...

अभंगाचा थांगपत्ता
न लागू देता
बुडवीत राहते आत्मक्लेष
मलाच इंद्रायणीत...

**– वीरभद्र मिरेवाड**
भ्रमणध्वनी : ९१५८६८१३०२

## हाँगकाँगच्या रस्त्यावर

मी असतेच तिथे
थेट रस्त्यावर
तुमच्याबरोबर
स्वातंत्र्यासाठी
अश्रुधुर, लाठ्या झेलताना
ड्रॅगनच्या लाल विळख्याला
विरोध करताना
निषेध करताना
काळ्या कायद्याचा
मी आहेच तिथे
असेनही तुमच्याबरोबर
तुमच्या अथक लढ्यात
स्वातंत्र्याचा ध्वज उंचावताना
स्मरणात आहे आमच्या
तिआनमेनचा इतिहास
आणि देतो आम्हाला प्रेरणा
मेलो तरी लढण्याची–
तुमचे स्वातंत्र्य तुम्हाला मिळो
अस्मिता तुमची, सर्वकाळ झळाळो...
मी आहेच तिथे
तुमच्याबरोबर...

**– डॉ. ऊर्मिला चाकूरकर**
भ्रमणध्वनी : ९४२०८१००४१

## पाणी

थेंबे थेंबे नभ ओघळते!
पांदीमधून जल खळखळते!

भरून दुथडी ओढे पळती
पुरामुळे पण नदी उसळते

ओलाव्याने हिरवळ झाली
वाऱ्यासंगे तृण सळसळते

जलसिंचन हे मुक्त नभीचे
तप्त धरेवर जीवन फळते

इकडे फुरफुर, तिकडे किरणे
इंद्रधनुही रंग उधळते!

वारा अवखळ झटकू मरगळ
धुंद सुगंधी वन दरवळते

कुरण चराऊ मुक्या जिवांना
शिरते अंगी नवीन बळ ते!

झडी राहिली कधी निरंतर
घास मुखीचा लुटून पळते

शेतकरी मग हवालदिल तो
नयनी त्याच्या पाणी खळते!

**– प्रा. किसन वराडे**
भ्रमणध्वनी : ९३२६०१९६०६

## ती आहे... इतकंच पुरेसं नाही

ती उठते रोज पहाटे,
स्वतःला मागे ठेवून...
स्वयंपाकघराच्या वाफा होत जातात तिचं सौंदर्य.
तू झोपली होतीस का पुरेशी? तिचा तिलाच प्रश्न...

ती हसते,
पण तिच्या हास्याच्या मागे
असतात शेकडो अनुत्तरित प्रश्न
कधी 'असणं' पुरेसं वाटत नाही...
कधी 'नसणं'च जास्त शांत वाटतं...

ती आरशात पाहते,
तिला आरसा नाही – पोकळी दिसते.
ती कधी आई, कधी पत्नी, कधी बहीण
पण 'ती' म्हणून तिला कुणी ओळखत नसते...

ती विचारते स्वतःला–
मी हक्कानं रडू शकते का?
की तेही नजरेतले दुर्बलतेचे डाग ठरतील?

तिचं मन म्हणजे तहानलेलं गूढ सरोवर,
जिथे कोणी पोहत नाही–
तिचं मूकपणे गगनाला भिडणं आणि लढणं
नाही म्हणता म्हणताही लढते–
स्वतःच्या अस्तित्वासाठी,
'असण्याच्या' पूर्णत्वासाठी लढते...

आता ती घडवू पाहते आहे – एक नवं रूप.
जे तिच्या हसण्यात, शांततेत आणि संघर्षात उमलतंय.
कारण जगणं तिला शिकवतंय...
प्रत्येक क्षणात,
एखाद्या नजरेत, एखाद्या शांत श्वासात–
ती जपते आहे स्वतःची एक-एक ओळख.
आता ती प्रश्न नाही–
तीच आहे उत्तर! तिच्या नजरेतच उत्तरांची झलक...

**– डॉ. वर्षा तोडमल**
भ्रमणध्वनी : ९०९६९५१२००

## पावसातल्या कहाण्या

तू जवळ आल्यावर
मनात तरंगणारे कोरडे ढगही
भरायला लागतात हळूहळू
शब्दात रंगतात शब्द
अन् मनातल्या ढगालाही फुटतो पाझर
अन् वेळ येते परतण्याची तेव्हा
पावलंच घुटमळतात पावलात
आणि सुरू होतो पाऊस दुराव्याचा
माझ्याच मनातल्या मनात...
चार पावलं ओलांडल्यावर
तूही वळतेस गुंतलेल्या नजरेने
तेव्हा तुझ्याही पाणीदार डोळ्यातून
बरसत असतात
पांढऱ्या शुभ्र टपोऱ्या धारावर धारा...
तुझ्या आणि माझ्या पावसात
भिजतात त्या मुक्या भावना
नाहतात शेंड्यापासून बुडापर्यंत
तुझ्या अन् माझ्या विरहात...
वेळ टळून जाते, दिवस निघून जातात
सुकलेल्या डोळ्यांत नवे झरे फुटतात
आणि माझ्याच फाटक्या मनात उफाळून येतात
पुन्हापुन्हा त्या पावसातल्या कहाण्या

**– संजय ऐलवाड**
भ्रमणध्वनी : ९४०३५०२४४३

## बाप कल्पतरूचे झाड

चिमणी पाखरं घेऊन
सारा संसार थाटतो
त्याच्या उतारवयात
बाप परका वाटतो

घालूनपाडून बोलता
हुंदका उरात दाटतो
जसा मुचकुणी काटा
खोल जिव्हारी डाचतो

मुलांना जरी आली थंडी
थोडा जरी भरला ताप
डोळे मिटून असले तरी
रात्रभर नाही झोपलेला बाप

पिल्लांच्या काळजीने
काढतो पिंजून गाव
नाही दिसत कुणाला
त्याच्या हृदयाचे घाव

बाप असतो देवता
सारे पुरवितो लाड
हयातभर देतो सावली
बाप कल्पतरूचे झाड

घराच्या भेगाळल्या भिंती
पांढऱ्या मातीनं लीपावं
त्याच्या थकल्या जीवाला
नाजूक हातानं जपावं

**– व्यंकट अनेराये**
भ्रमणध्वनी : ७५८८४२५३१९

## सोपं नसतं...

सोपं नसतं कधी
खोटं खोटं हसणं
मनात सल ठेवून
बाहेरून खुलणं

सोप्पं नसतंच कधी
गणित आयुष्याचं मांडणं
झाल्याच चुका जगताना
तर खोडताही न येणं

सोपे नसतात मार्ग
गाठावे ते हिमतीने
सोप्या नसतात दिशा
पार कराव्या त्या धैर्याने

दुःखानंतर असतेच
सुखाची पाऊलवाट
ज्याच्या–त्याच्या संसाराचा
ज्याचा–त्याचा थाट

भावनांच्या गर्ततेत
झोकून जेव्हा जाऊ
लढत–लढत दुसऱ्याला
आधारही देऊ!

**– श्रुती हजारे**
भ्रमणध्वनी : ९५८८६७८७९५

## बाप

अवगड–बिवगड वाटा तुडवित, शेतामदी राबतो बाप
ठेचाळूनी फुटती बोटे, डोक्यालाबी चढतो ताप.

नांगर–बिंगर मारून ताशीत, ढेकळ–बिकळ फोडीत जातो
संसाराचं बिजगणित हे, मातीमदी पेरीत जातो.

पाखरं–बिकरं हुसकावीत, कधी चुकवतो विंचू, साप
अवगड–बिवगड वाटा तुडवित, शेतामदी राबतो बाप.

गोंडर–बिंडर पिकलं तर, आनंदाने खात असतो
तोलामोलाचं जगणं सारं, अभंगातून गात असतो.

लेकरं–बिकरं पोसण्याचं, सपन–बिपन पाहत जातो
सावकारांच्या देण्याघेण्यात, आयुष्यभर वाहत जातो.


मातीमदी राबूनराबून, डोळ्यालाबी चढते झाप
अवगड–बिवगड वाटा तुडवित, शेतामदी राबतो बाप.

**– प्रा. रामदास केदार**
भ्रमणध्वनी : ९८५०३६७१८५

# पुस्तकपरिचय

## सदानंद पुंडपाळ

### ५१ नामवंतांची भाषणे





श्री. अशोक बेंडखळे यांचे '५१ नामवंतांची भाषणे' हे संपादित पुस्तक चिकित्सक अभ्यासूंनी कायम संग्रही ठेवावे असे आहे. वक्तृत्व कला ही व्यक्तिमत्त्व विकासात मोलाची ठरते. आपल्या विचारशक्तीला वळण लावण्याचे काम ती करीत असते. मानवी इतिहासामध्ये अशा अनेक वक्त्यांनी आपल्या वक्तृत्वाने आपापला काळ गाजवला असून इतिहासाला वळण देण्याचे काम केल्याचे दिसते. म्हणूनच त्या काळाला-युगाला त्यांचेच नाव देण्यात आल्याचे दिसते. या वक्त्यांनी राजकीय, सामाजिक, सहकार, उद्योगधंदे, विज्ञान, समाजसेवा इत्यादी विविध क्षेत्रांत मोलाची कामगिरी केल्याचे दिसते. या पुस्तकाला प्रस्तावना लिहिताना ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर म्हणतात, 'प्रत्येक माणसाला स्वतःची वैचारिक, भावनिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगल्भता जर अधिकाधिक उंचीवर न्यायची असेल, तर आपल्याला आत्मविश्वासाबरोबर खुले मन पाहिजे.' आणि ते मन खुले होण्यासाठीच या पुस्तकातील ५१ नामवंतांची भाषणे अभ्यासली पाहिजेत, त्यांचे मनन केले पाहिजे.

या पुस्तकात श्री. बेंडखळे यांनी गेल्या शे-दोनशे वर्षांतील जे कृष्णमूर्ती, रवींद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद यांच्यासारखे दहा विचारवंत, जे आर डी टाटा, डॉ. मनमोहनसिंग, डॉ. अब्दुल कलाम, रतन टाटा यांसारखे उद्योग-सहकार क्षेत्रातील सात, महात्मा जोतिबा फुले, बाबा आमटे, मदर टेरेसा इत्यादी आठ समाज सुधारक, म. गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस, पं. नेहरू इत्यादी तेवीस राजकीय नेते यांच्याबरोबरच चित्रपट क्षेत्रातील सत्यजित रे, एकाहत्तरच्या बांग्ला देश युद्धाचे हीरो फिल्डमार्शल माणेकशॉ आणि क्रांतिवीर भगतसिंग अशा एकावन्न व्यक्तींच्या भाषणांची शिदोरी आपल्यासमोर ठेवली आहे. यातील बहुतांश व्यक्तींची भाषणे इंग्रजीमध्ये असून त्या इंग्रजी भाषणांचा अनुवाद करून ती आपल्यापर्यंत त्यांनी पोचवली आहेत. ती

मिळवताना त्यांना काय करावे लागले, हे श्री. बेंडखळे यांच्याच शब्दांत वाचायला हवे. बाबा आमटे यांनी ''तुम्हा तरुणांना लोकनेते व्हायचे असेल, तर तुमचे डोळे क्षितिज भेदून जाणारे असावे लागतात आणि समाजातील पहारेकऱ्यांवरही पहारा ठेवणारे असावे लागतात. आपल्या उत्तुंग भावनांना कधी कोमेजू देऊ नका'' असे सांगितले आणि अनेक तरुण चेतवले गेले. उद्योगपती जे आर डी टाटांनी सांगितले, ''जे खाजगी उद्योग फायद्यात आहेत, त्यांनी सामाजिक बांधिलकी मानणे आपली संस्कृती मानायला हवी.'' स्वराज्याचा खरा अर्थ सांगताना बॅ. नाथ पै म्हणतात, ''ज्या दिवशी जनता आणि सरकार, राज्यकर्ते आणि प्रजा यांच्यामध्ये जिव्हाळ्याचं नातं निर्माण होते, तिथेच लोकशाही प्रस्थापित झालेली असते.''

या पुस्तकातील सर्वच नामवंतांची भाषणे अशीच समाज बदलून टाकणारी, उत्तम, उदात्त, उन्नत गोष्टींचा अंगीकार करायला प्रवृत्त करणारी आहेत. कारण त्यांच्या वक्तृत्वाला त्यांच्या विशुद्ध कर्तृत्वाचे नैतिक अधिष्ठान होते. ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर ब्लर्बमध्ये म्हणतात तसे 'एक सर्वंकष जीवनविषयक दृष्टिकोन प्राप्त होण्यासाठी अशा पुस्तकांची नितांत गरज आहे.'

**५१ नामवंतांची भाषणे** – संपादक–अशोक बेंडखळे
प्रकाशन – संधिकाल प्रकाशन
पृष्ठे – २४८; किंमत – रु. ३००/–




## हे झाड चेतनेचे

गद्य लेखन आणि पद्य किंवा कविता लिहिणे यामध्ये जमीन–अस्मानाचा फरक असतो, तो केवळ ओळींचा किंवा व्याप्तीचा फरक नाही. '*काठोकाठ भरू द्या पेला, फेस भराभर उसळू द्या*' अशा भावनांच्या उत्कट ऊर्मीतून कविता जन्मास येते. गद्याचे तसे नाही. कविता तालबध्द असते, कवितेचा ताल आणि यमक यांची सूत्रबध्दता नियमित करणाऱ्या शास्त्राला काव्यशास्त्र म्हणतात. गजल तर कवितेहूनही तरल असते.

'हे झाड चेतनेचे' हा कवी अशोक गुप्ते यांचा नवा कोरा गजलसंग्रह. गजलकार हा हळवी तरल कल्पनाशक्ती लाभलेला

अतिसंवेदनशील मनाचा कवी असतो असे मानण्यात येते. श्री. गुप्ते त्याला अपवाद नाहीत. त्यांच्या या गजलसंग्रहाची कविवर्य अशोक बागवे यांनी पाठराखण केली असून ते म्हणतात, ''काव्यगत लयीच्या आरोह-अवरोहातून कवितेची शैली तयार होत जाते. छंदोरचनेत ती 'ठाय लय' असते, गजलेमध्ये ती 'आर्तविभोर' होते, तर मुक्तशैलीत ती 'बेबंदपणे' प्रकट होते. त्यातच गजल ही निव्वळ शब्दांची कसरत नसते, शब्दांना अम्लान रूपसौंदर्य, सतेज रसवता, अक्षय गंध नि करुणामय स्पर्श जेव्हा लाभतो, तिथे गजलचा बंध जन्माला येतो.'' श्री. गुप्ते यांच्या गजल वाचताना याची पदोपदी प्रचिती येते.

यातूनच 'आता सूर्य कोठे सख्या मी पहावा?' या गजलेत कवी म्हणतो,

*'आता सूर्य कोठे मी पाहावा?*
*इथे काजव्यांचा महापूर यावा'*


किंवा *'वस्तीच गप्प आहे गस्तीत सैनिकांच्या,*
*बेड्याच ठोकलेल्या हातांत लेखकांच्या'*

यापेक्षा स्फोटक उद्विग्नता ती आणखी कोणती असणार?

'तुम्हाला कविता किंवा गजल सुचते कशी?' या प्रश्नाचे उत्तर देताना कवी श्री. गुप्ते म्हणतात, ''डोंगरावरून राक्षसी वेगाने धबाधबा बरसणाऱ्या धबधब्याच्या प्रवाहाप्रमाणे क्षणोक्षणी बदलणारी स्फोटक राजकीय परिस्थिती, नैतिकतेच्या संकल्पनांना हादरे देणारे, अधिकाधिक वस्त्रहीन होत जाणारे, सलणारे टोकदार आणि अपरिहार्य सामाजिक बदल, दूर दूर होत जाणारी पातळ नाती, वाढती व्यसनाधीनता, खेळात राजकारण आणून राजकारणाचा खेळखंडोबा करणारे, नीतिमत्ता गुंडाळून स्वार्थालाच प्राधान्य देणारे बेजबाबदार राजकीय नेते इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम कवीच्या संवेदनशील मनावर होत असतो. त्यातून त्याचे भावविश्व ढवळून निघते. कवी ते सारे आपल्या समोरच्या कोऱ्या कागदावर उतरतो आणि हे सारे म्हणजेच कवीच्या गजला वाढवायला लागणारे खत आहे.''

हीच भावना गुप्ते यांच्या या संग्रहातील प्रत्येक गजलेमध्ये प्रतीत झालेली दिसून येते. या संग्रहात ८१ गजला असून त्या प्रेमविषयक, आध्यात्मिक, सामाजिक व राजकीय आणि इतर विषय अशा चार विभागांत विभागलेल्या आहेत. गजल लिहिणे वाटते तेवढे सोपे नाही. म्हणूनच ते म्हणतात, 'आगगाडीच्या डब्यांप्रमाणे मात्रांच्या साखळीने एकामागोमाग एक बांधलेले शब्द म्हणजे गजल नव्हे.' येरा गबाळ्याचे काम नव्हे ते!

**हे झाड चेतनेचे –** अशोक गुप्ते
पृष्ठे – ९३; किंमत – रु. १५०/–
प्रकाशन– संवेदना प्रकाशन




## प्रतिभारंग


'प्रतिभारंग' हा लेखिका, कवयित्री प्रतिभा सराफ यांचा दैनिक प्रहारमधील त्याच नावाच्या सदराखाली लिहिलेल्या ललितलेखांचा संग्रह आहे. श्रीमती सराफ खरंतर भौतिकशास्त्राच्या प्राध्यापिका, पण त्यांचे तरल कविमन रमते ते कथा, कविता आणि अशाच कल्पनेच्या भराऱ्या घेणाऱ्या साहित्य क्षेत्रात. प्रतिभारंग या सदराबद्दल त्या म्हणतात, एका कार्यक्रमात प्रहारचे संपादक डॉ. सुकृत खांडेकरांना त्यांचे भाषण खूपच आवडले आणि श्री. खांडेकरांनी त्यांना प्रहारमध्ये सदरासाठी लेखन करायला सांगितले, पण 'विशिष्ट शब्दमर्यादेत डेडलाइन पाळून लिहिणे जमणार नाही' असे त्या म्हणाल्या आणि त्यांना शब्दमर्यादेचे कोणतेही बंधन न घालता त्यांनी लिहायला सांगितल्यावर त्यांनी प्रहारमध्ये सुमारे दीड वर्षं लेखन केले, तेच प्रतिभारंग या पुस्तकाच्या रूपात प्रकाशित झाले आहे. यामध्ये त्यांनी अध्यात्मापासून वाढदिवस, विज्ञान आणि तंत्रज्ञान, रिकामे पाकीट, स्मरणशक्ती, लोकसंख्या, माणुसकी, कानाचा नंबर वाढतोय, लष्कराच्या भाकरी, अशा एकाचा दुसऱ्याशी दुरान्वयानेही संबंध नसलेल्या विविध विषयांवर लिहिले आहे. त्यात साधे कथन आहे, तसेच व्यक्तिमत्त्वाचे हवे-नको वाटणारे कंगोरे दाखवणारे संवादही आहेत, सोबत आपल्या मुक्तचिंतनाला त्यांनी कडू-गोड स्वानुभवाचीही जोड दिली आहे, जे वाचल्यानंतर वाचक आंतर्मुख होऊन त्यात आपल्यालाही पाहू लागतो, हेच या लेखांचे यश आहे. यातूनच सराफांच्या प्रतिभेचा आणि व्यासंगाचा आवाका लक्षात येतो.

विशिष्ट शब्दमर्यादा, डेडलाइन आणि काही बंधने पाळून लिहिताना ते लेखकाच्या मनासारखे होईलच असे नाही. काही वेळा ती केवळ शाब्दिक कारागिरी ठरू लागते किंवा मागणीप्रमाणे घातलेला तो रतीब ठरू वाटतो. यासाठी लेखकाच्या मनामध्ये जे काही आहे, त्याच्याशी तो एकरूप होऊन कोणत्याही बाह्यबंधनाशिवाय जे कागदावर उतरेल, तेच सरस ठरते. प्रतिभा सराफ यांनी याच पध्दतीने हे लेखन केले असून कविवर्य अरुण म्हात्रे यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांच्या लिखाणात काव्य असतं, ललित असतं, छोट्या कथा असतात, एखाद्या गोष्टीचे निरुपण असते, वर्णन असतं आणि चांगल्याचे उदात्तीकरणही असतं, हे सगळं प्रतिभेच्या नजरेतून बघणं आणि अनुभवणं आनंददायी आहे.

या संग्रहाला कविवर्य अरुण म्हात्रे आणि सराफ यांच्याच सहकारी रजनी

कुलकर्णी यांच्या शुभेच्छा लाभल्या असून डॉ. सुकृत खांडेकर यांनी त्याची पाठराखण केली आहे. ते म्हणतात, 'प्रतिभा म्हणजे विचारांचा खजिना आहे. साधे सोपे लेखन, त्याला बुद्धिमत्तेची जोड आणि विविधतेचा बाज यात प्रतिभाचा हातखंडा आहे.'

**प्रतिभारंग** - प्रतिभा सराफ
प्रकाशन- व्यास पब्लिकेशन हाउस
पृष्ठे - १६०; किंमत - रु. २५०/-




## शब्द ऋतू - निवडक लक्ष्मीकांत तांबोळी


'शब्द ऋतू- निवडक लक्ष्मीकांत तांबोळी' हा ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मीकांत तांबोळी यांच्या निवडक साहित्याचा ग्रंथ रणधीर शिंदे यांनी संपादित केला आहे. लक्ष्मीकांत तांबोळी यांनी दोन कथासंग्रह, चार कादंबऱ्या, पाच कवितासंग्रह, चार ललित-गद्यसंग्रह, एक समीक्षाग्रंथ व मार्ग सुखाचा हा प्रौढ साक्षरांसाठीचा ग्रंथ असे विपुल लेखन केले आहे. मराठवाड्यात वाढलेल्या तांबोळी यांच्या कुटुंबात धार्मिक वातावरण होते. त्याचा त्यांच्या जडणघडणीवर व भावविश्वावर आपसूकच परिणाम झाला. त्यातूनच महाभारताच्या आकर्षणापोटी त्यांनी काही पौराणिक विषयांवरील कादंबऱ्या लिहिल्या होत्या. असे असले तरी त्यांचे प्रारंभीच्या टप्प्यातील साहित्य आज फारसे उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांच्या सहस्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्ताने त्यांच्या निवडक साहित्याचा खंड प्रकाशित व्हावा असे मनोविकास प्रकाशनचे अरविंद पाटकर आणि लक्ष्मीकांत तांबोळीचे सुपुत्र डॉ. रवींद्र तांबोळी यांना वाटत होते. डॉ. रवींद्र तांबोळी यांनी तसे काम सुरूही केले होते, पण एका टप्प्यावर त्यांनी ते काम रणधीर शिंदे यांच्याकडे सोपवले आणि आज 'शब्द ऋतू- निवडक लक्ष्मीकांत तांबोळी' हा संपादित ग्रंथ साकार झाला आहे.

'एखादा लेखक निष्ठेने बहुविध वाङ्मयीन कामगिरी करतो, त्याचे काहीएक आकलन व्हावे, त्याच्या वाङ्मयाचे स्वरूप समजून घ्यावे, याच धारणेतून अशी लेखक-संपादने महत्त्वाची ठरू शकतात. या संपादनात लक्ष्मीकांत तांबोळी यांच्या साहित्याचे प्रातिनिधिक दर्शन आहे. तांबोळी यांच्या वाङ्मयाचे स्वरूप, तीमधील

विविधता व परिवर्तने ध्यानात येतील अशा साहित्याचा त्यात समावेश आहे,' असे संपादक रणधीर शिंदे म्हणतात. त्यांनी आपल्या प्रदीर्घ प्रस्तावनेत लक्ष्मीकांत तांबोळींच्या जन्मापासून त्यांच्या साहित्यिक वाटचालीचा आढवा घेतला आहे. तांबोळी यांचे सुपुत्र डॉ. रवींद्र यांनीही 'माझे नाना- एक अनासक्त आत्मव्रती' असे एक प्रकरण लिहिले आहे. आणि ''जी व्यक्ती ईश्वराला '*दयाळा एवढे द्यावे, फुलांचे रंग न जावे, उडाया पाखरांसाठी जरा आभाळ ठेवावे*' अशी प्रार्थना लिहिते त्या व्यक्तिमत्त्वाचा मुलगा असणे हा एक सर्वश्रेष्ठ लाभयोग आहे,'' अशा आपल्या वडिलांप्रतिच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

या ग्रंथाच्या पुढच्या भागामध्ये त्यांच्या सर्व कविता, कथा, कादंबरी, ललित लेख, समीक्षा आणि शेवटी मराठवाडा साहित्य संमेलन, मानवत येथील अध्यक्षीय भाषण दिले आहे, असा या ग्रंथाचा पसारा आहे. काही वर्षांपूर्वी इयत्ता आठवीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकात त्यांची 'सैनिकी रक्त' ही कथा होती, ती अनेकदा वाचल्याचे आजही स्मरते. आज त्यांचे बरेच लेखन स्वतंत्ररीत्या उपलब्ध नसलेले. अभ्यासूंना हा ग्रंथ पर्वणीच ठरेल.

**शब्द ऋतू – निवडक लक्ष्मीकांत तांबोळी**
संपादक – रणधीर शिंदे
प्रकाशन – मनोविकास प्रकाशन
पृष्ठे – ४९६; किंमत – रु. ७९९/-




## शतकोत्तरी ओरखडा

'शतकोत्तरी ओरखडा' हा कविवर्य राजीव जोशी यांचा वर्णमुद्रा प्रकाशनाने प्रकाशित केलेला नवीन कवितासंग्रह. या संग्रहात पहिल्या भागात शंभर कविता आणि 'अजून काही उरल्यासुरल्या' या सदराखाली बावीस अशा एकशे बावीस कवितांचा समावेश आहे. जग आज ग्लोबल व्हिलेज बनतेय असे सांगत असतानाच एकाच छताखाली राहणाऱ्या एकाच कुटुंबातील व्यक्तींचाही एकमेकाशी सुसंवाद उरलेला नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. कवी राजीव जोशी यांचे यापूर्वी ताजाकलम, संकीर्तन आणि कानामात्रावेलांटी हे तीन कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांची नावे जरी

वाचली, तरी त्यांच्या आशयाची कल्पना येऊ शकेल. ही कविता चिंतनपर आणि गंभीर स्वभावाची आहे.

शतकोत्तरी ओरखडा या कवितासंग्रहाच्या मनोगतात ते म्हणतात, ''प्रत्येक नात्यावरचा विश्वास उडावा असे विलक्षण जीवनानुभव, अस्तित्वासाठी अटळ संघर्ष, वासना व प्रसिद्धीची विकृती आणि सत्तेचा माज, मद पावलोपावली भरलेला. प्रत्येक वेळी सोल्झेनित्सियन होत गेलो, काही करू पाहता अनर्थ रुजणे आणि अबोलणेही विपरीत होणे हे भागध्येयच. यातून आलेल्या एकाकीपणात व्यक्त होण्याला केवळ कविता सोबत आहे. शब्दांच्या सहवासाने कायम आनंदी ठेवले हे खरे. पण बॅक ऑफ द माइंड, माउलीपासून बुद्ध, आंबेडकर, गांधी, अगदी शंकराचार्यही जवळचे वाटावे ही कवितेने दिलेली समृद्धी आहे.''

या संग्रहाला ज्येष्ठ साहित्यिक डॉ. किशोर सानप यांची प्रदीर्घ प्रस्तावना आहे. त्यांनी त्यात श्री. राजीव जोशी यांच्या याआधीच्या तिन्ही कवितासंग्रहांचा आढावा घेऊन या संग्रहाची चिकित्सक समीक्षा केली आहे. ते म्हणतात, श्री. जोशी यांची कविता ''अत्याधुनिक जीवनशैलीतील मूल्यपरिवर्तन आणि ग्लोबल गतीमागे धावणाऱ्या मानवी जगाची वाताहत घेऊन येत आहे. युगविनाशाकडे हळूहळू सरकणाऱ्या मानवीसृष्टीच्या विसंवादाची पार्श्वभूमी त्यांच्या कवितेला लाभली आहे.'' 'माझे विद्यापीठ' लिहून स्वतःच विद्यापीठ बनलेले कवी नारायण सुर्वे त्यांचे आदर्श आहेत. त्यांच्याप्रमाणेच राजीव जोशी यांनी केवळ दोन सव्वादोनशे कविता लिहिल्या आहेत, पण कवीचे मोठेपण त्यांच्या काव्यसंख्येवर नव्हे, तर काव्यगुणवत्तेवर निर्भर असते. त्यांची गुणवत्ता आणि विषयवैविध्य व नवीन प्रतिमासृष्टीची निर्मिती केल्याने मराठी कवितेत त्यांच्या कवितेचे अनन्यसाधारण असे स्थान आहे. डॉ. सानप त्यांच्या कवितेचे वेगळेपण सांगताना म्हणतात, ''पुराणकथा, मिथककथा, लोककथादींना अत्याधुनिक ग्लोबल व्हिलेजच्या बदलत्या काळाची परिमाणे त्यांनी दिली आहेत. रोबोट बनत चाललेल्या मानवी समाजाच्या संदर्भात प्रतिमा, प्रतीके, रूपक, प्रास, यमक आदींच्या मदतीने नवनवीन भाषिकरूपांची निर्मिती केली आहे. त्यांच्या आशयाला शैली, अभिव्यक्ती व काळाची त्रिमिती परिमाणे देणे, हे रचना व शैलीचे वेगळेपण आहे.'' सुंदर चिंतनशील, पण आकलनास थोडी अवघड कविता.

**शतकोत्तरी ओरखडा –** राजीव जोशी
प्रकाशन – वर्णमुद्रा प्रकाशन
पृष्ठे – २२९; किंमत – रु. ४००/-

कार्यवृत्तान्त

# साहित्य शाखा

मंगळवार, दि. २० मे रोजी जयंत नारळीकर यांचे निधन झाले. रविवार, दि. २५ मे रोजी दादरच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय', 'मुंबई मराठी साहित्य संघ' आणि 'मराठी विज्ञान परिषद' यांच्या संयुक्त विद्यमाने या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेच्या अध्यक्षस्थानी मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष जे.बी. जोशी हे होते. या सभेला डॉ. जयंत नारळीकर यांच्या मेहुणी ऊर्मिला गानू ह्यासुद्धा उपस्थित होत्या.

यावेळी मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू भालचंद्र मुणगेकर म्हणाले की, ''जयंत नारळीकर म्हणजे अद्‌भूत रसायन होते. त्यांच्या सहवासात मला राहायला मिळाले हे मी माझे भाग्य समजतो. त्यांच्यासोबत विचारांची झालेली देवाणघेवाण परिपक्व करणारी होती.'' आपले मनोगत व्यक्त करताना 'मुंबई मराठी साहित्य संघा'च्या अध्यक्षा अचला जोशी म्हणाल्या की, ''डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनामुळे आपल्याच घरातली एखादी व्यक्ती गेली आहे, असे वाटत आहे. अत्यंत प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्त्व असलेले नारळीकर सर्वांशी तन्मयतेने वागायचे.''

नेहरू तारांगणचे संचालक अरविंद परांजपे म्हणाले की, ''जयंत नारळीकर यांनी विज्ञान प्रसारासाठी जे काम केले, ते अत्यंत मोलाचे होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी माणसांवर विश्वास केवळ ठेवलाच नाही, तर माणसांना विश्वास दिलासुद्धा.''

डॉ. जयंत नारळीकर यांच्या मेहुणी ऊर्मिला गानू म्हणाल्या की, ''जयंत नारळीकर असामान्य बुद्धिवादी व्यक्तिमत्त्व होते. परंतु, त्यांनी कधीही कुणावरही आपले विचार लादले नाहीत. त्याचप्रकारे त्यांनी कोणाच्याही श्रद्धेची कुचेष्टा केली नाही. ते जितके प्रतिभावान लेखक होते, तितकेच कुटुंबवत्सलसुद्धा होते, याचा अनुभव आम्ही सगळ्यांनी घेतला.''


या श्रद्धांजली सभेची सांगता करताना जे.बी. जोशी म्हणाले की, ''जयंत नारळीकर यांनी जागतिक दर्जाचे संशोधन केले. यासोबतच संस्थेची निर्मिती करणे, त्याला दिशा देणे हे आव्हानसुद्धा त्यांनी पेलले. याव्यतिरिक्त त्यांची साहित्यिक कारकिर्द अत्यंत दिशादर्शक होती. त्यांचे हे गुण आपण पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली राहील.''

शोकसभेत साहित्य संघातर्फे प्रा. उषा तांबे, अशोक बेंडखळे आणि चंद्रशेखर गोखले यांनी उपस्थित राहून श्रद्धांजली वाहिली.

मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाह अ.पां. देशपांडे यांनी सभेचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन केले.

**– अशोक बेंडखळे**
कार्यवाह, साहित्यशाखा

# इये मराठीचिये नगरी



संपादनः अशोक बेंडखळे
डॉ.उज्ज्वला मेहेंदळे